मंगळवार, २६ एप्रिल २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक २७८
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## मुंबईचे माजी महापौर विश्वनाथ महाडेश्वर यांना अटक



**मुंबई :** भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांच्यावर झालेल्या हल्ल्याप्रकरणी शिवसेना नेते आणि मुंबईचे माजी महापौर विश्वनाथ महाडेश्वर यांना खार पोलिसांनी अटक केली आहे. महाडेश्वर यांच्यासह तीन नगरसेवकांना अटक करण्यात आली आहे. सोमय्या हल्ला प्रकरणात महाडेश्वर आणि काही शिवसैनिकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भाजप नेते किरीट सोमय्या राणा दाम्पत्यास भेटायला खार पोलीस ठाण्यात गेले होते. त्या वेळी आपल्यावर शिवसैनिकांनी हल्ला केल्याचा आरोप सोमय्या यांनी केला. यानंतर सोमय्या यांनी वांद्रे पोलिसांत धाव घेत हल्लेखोरांना अटक करण्याची मागणीही केली होती. या प्रकरणी माजी महापौर विश्वनाथ महाडेश्वर यांच्यासह चार जणांना मुंबई पोलिसांनी अटक केली. दरम्यान, आरोग्याच्या कारणास्तव त्यांचा जामीन मंजूर झाला असून सुटका करण्यात आली आहे.

**अंतरंग**

३ मेच्या अल्टिमेटमवर मनसे अद्यापही ठाम/२

मिटकरींच्या वक्तव्याचा रोहा ब्राह्मण मंडळातर्फे निषेध/५

नेरळमध्ये बनावट मालकाच्या सहाय्याने जमिनींची विक्री/७

### नवीन पनवेल, खांदा कॉलनीत पुरेसा पाणीपुरवठा न केल्यास

# सिडकोच्या कार्यालयाला टाळे ठोकणार

## मडका फोड आंदोलनातून भाजपचा इशारा




(अधिक छायाचित्रे पान ३ वर..)

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल परिसरातील पाणी प्रश्नासंदर्भात झोपलेल्या सिडकोला जागे करण्यासाठी भारतीय जनता पक्षातर्फे पनवेल महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी (दि. २५) मडका फोड आंदोलन करण्यात आले. सिडकोकडे पाण्याबाबत कोणतेही नियोजन नसल्याचे त्यांच्या अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करताना दिसून आल्याने या वेळी सिडकोचा निषेध करण्यात आला तसेच ७ मेपर्यंत नवीन पनवेल व खांदा कॉलनीत पुरेसा पाणीपुरवठा न केल्यास सिडकोच्या कार्यालयाला टाळे ठोकून कर्मचाऱ्यांना आत जाण्यास मज्जाव करू, असा इशारा देण्यात आला आहे.

> *आम्ही सिडकोच्या अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करायला गेल्यावर लक्षात आले की, त्यांना किती एमएलडी पाण्याची गरज आहे याची माहिती नाही. हे आपले दुर्दैव आहे की, असे अधिकारी आपल्याकडे आहेत. त्यामुळे सभागृह नेते परेश ठाकूर म्हणाले त्याप्रमाणे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली सिडकोच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे बैठक घेण्याचा प्रयत्न करणार आहोत, पण ७ मेपर्यंत नवीन पनवेल व खांदा कॉलनीत पुरेसा पाणीपुरवठा न केल्यास सिडकोच्या कार्यालयाला कुलूप लावून कर्मचाऱ्यांना आत जाण्यास मज्जाव करणार आहोत. त्यासाठी आमच्यावर गुन्हे दाखल झाले तरी चालतील.*
>
> **–ॲड. मनोज भुजबळ,** *नगरसेवक*

नवीन पनवेलमधील अग्निशमन केंद्रापासून निघालेल्या मटका मोर्चात भाजप ओबीसी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष व नगरसेवक मनोज भुजबळ, भाजप शहर अध्यक्ष जयंत पगडे, मनपा प्रभाग समिती अध्यक्ष वृषाली वाघमारे, नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, प्रकाश बिनेदार, संतोष शेट्टी, तेजस कांडपिळे, एकनाथ गायकवाड, समीर ठाकूर, अजय बहिरा, नगरसेविका चारुशीला घरत, सुशीला घरत, राजश्री वावेकर, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, स्मिता वाणी, भाजप शहर सरचिटणीस अमरीश मोकल, ज्येष्ठ नेते सी. सी. भगत, भीमराव पोवार, महिला मोर्चा शहर अध्यक्ष वर्षा नाईक, राकेश भुजबळ, हेमंत भुजबळ,

> *नवीन पनवेल सेक्टर १२, १५ ए व १मधील ओव्हरहेड पाण्याच्या टाक्या सिडकोने पाडल्या आहेत. त्या नवीन बांधण्याचे आश्वासन देऊनही अद्याप बांधल्या नाहीत. सिडकोने आपल्या मालकीचे मोर्बे धरण नवी मुंबई महापालिकेला देऊन पनवेलकरांची फसवणूक केली आहे. जनतेचा आक्रोश सिडकोला समजावा आणि पाण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा निघावा म्हणून हे आंदोलन करण्यात आले.*
>
> **–परेश ठाकूर,** *सभागृह नेते, पनवेल महानगरपालिका*

रमेश पोवार, प्रशांत फुलपगार, जितेंद्र वाघमारे, ॲड. किशोर धाकड, राहुल वाहुळकर, रावसाहेब खरात, मनीषा चिले, क्रांतीकुमार चितळे, किशोर शिंदे, अजित लोंढे, नारायण चव्हाण, मयुरी उनडकट, प्रीती भुजबळ, गौरी पवार, विजय खरात, योगेश आखाडे, अनंत जाधव, आरती तायडे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सिडको कार्यालयाच्या गेटवर पोलिसांनी मोर्चा अडवल्यावर सिडकोविरोधात घोषणा देत मोर्चेकऱ्यांनी आपल्या हातातील मडकी तेथे फोडली.

यानंतर सिडकोचे कार्यकारी अभियंता चौथानी व उपकार्यकारी अभियंता पांडुळे कार्यालयात आल्यावर त्यांनी मोर्चेकऱ्यांना चर्चेसाठी बोलाविले. नवीन पनवेमध्ये दोन महिन्यांपासून अनियमित, कमी दाबाने व खंडित पाणीपुरवठा होत आहे. नवीन पनवेल सेक्टर १२, १५ ए व १मधील ओव्हरहेड पाण्याच्या टाक्या सिडकोने पाडल्या आहेत. त्या नवीन बांधण्यास मंजुरी असतानाही अद्याप का बांधल्या नाहीत याबाबत माहिती देताना अधिकारी देत असलेली माहिती थातुरमातुर असल्याचे दिसून आले. (पान २ वर..)

(छाया : लक्ष्मण ठाकूर) अधिक छायाचित्रे पान ८ वर..



# रायगडचा मिडलाईन संघ राज्यस्तरीय आमदार प्रशांत ठाकूर चषकाचा मानकरी

## कबड्डी स्पर्धेचे मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण

**पनवेल, कर्जत :**
**रामप्रहर वृत्त, बातमीदार**



पनवेलमध्ये झालेल्या राज्यस्तरीय आमदार प्रशांत ठाकूर चषक भव्य दिव्य कबड्डी स्पर्धेच्या अंतिम रोमहर्षक लढतीत रायगड जिल्ह्याच्या मिडलाईन स्पोर्ट्स क्लबने (कर्जत) सरस कामगिरी करीत विजेतेपद पटकाविले, तर रत्नागिरी चिपळूणचा दसपट्टी संघ उपविजेता ठरला. मिडलाईन क्लबचा सुयोग गायकर व दसपट्टी मंडळाचा अभिषेक भोजने स्पर्धेतील मालिकावीर खेळाडू ठरले.

अत्यंत उत्तम आणि शिस्तबद्ध आयोजनामुळे प्रो कबड्डीसारखा थरार महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन व रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या मान्यतेने जय भवानी नवतरुण मंडळाने धरणा कॅम्प येथे आयोजित केलेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत क्रीडारसिकांना अनुभवायला मिळाला. या स्पर्धेतील विजेत्यांना रायगडचे माजी पालकमंत्री तथा आमदार रवींद्र चव्हाण व आमदार निरंजन डावखरे यांच्या हस्ते आणि भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. या वेळी आमदार रवींद्र चव्हाण व आमदार निरंजन डावखरे यांनी उत्कृष्ट आयोजनाबद्दल कौतुक केले. (पान २ वर..)

## निवडक

### स्थानिक निवडणुकांसंदर्भातील सुनावणी पुन्हा पुढे ढकलली

**नवी दिल्ली :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबतचे (निवडणुकांच्या तारखा, प्रभाग रचना अधिकार) अधिकार राज्य सरकारने निवडणूक आयोगाकडून काढून स्वतःकडे घेतले होते. त्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. याबाबतची सुनावणी सोमवारी (दि. २५) पुन्हा पुढे ढकलण्यात आली असून येत्या ४ मे रोजी त्यावर सुनावणी होणार आहे. त्यामुळे राज्यातील महापालिका, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका पावसाळ्यानंतरच होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### माजी केंद्रीय गृहसचिव माधव गोडबोले यांचे निधन

**मुंबई :** माजी केंद्रीय गृहसचिव डॉ. माधव गोडबोले यांचे सोमवारी (दि. २५) वृद्धत्वाने निधन झाले. त्यांनी वयाच्या ८७व्या वर्षी पुण्यातील राहत्या घरी अखेरचा श्वास घेतला. प्रशासकीय कारकीर्दीसोबतच विविध विषयांवरील अभ्यासपूर्ण लेखनासाठी ते परिचित होते.

# वादळी वाऱ्यासह गारांच्या पावसाने महाडला झोडपले



**महाड : प्रतिनिधी**

संपूर्ण दिवसभर तापमानाचा पारा चढलेला असताना महाड शहर आणि परिसराला सोमवारी (दि. २५) संध्याकाळी अचानक विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह गारांच्या पावसाने झोडपून काढले. त्यामुळे थंडावा आला असला तरी बागायतीचे मोठे नुकसान झाले आहे.

महाडमध्ये सोमवारी सकाळपासूनच अंगाची लाही लाही होत होती. दुपारी पारा ३७ अंश सेल्सियसपर्यंत पोहचला असताना ४ वाजण्याच्या सुमारास संपूर्ण महाड औद्योगिक परिसर तसेच शहर आणि इतर ग्रामीण भागात सोसाट्याच्या वारा आणि विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाने सुरुवात केली. काही वेळातच या पावसामध्ये गारादेखील पडू लागल्या. अचानक सुरू झालेल्या वादळी वाऱ्यामुळे शहरातील अनेक दुकानदारांनी आपली दुकाने बंद करून घेतली. या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मात्र मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

### वीटभट्टी आणि आंबा पिकाचे नुकसान

अवकाळी पावसामुळे आंबा पीक संकटात सापडले आहे. त्याचबरोबर महाड तालुक्यात जवळपास ६० ते ७० वीट उत्पादक आहेत. सध्या लाखोंच्या संख्येने विटा तयार होऊन भट्टी लावण्यासाठी सज्ज असताना अचानक आलेल्या पावसामुळे वीटभट्टीधारक अडचणीत आले आहेत, कारण त्यांचे लाखोंचे नुकसान झाले आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या इशाऱ्यावरूनच मुंबईत हल्ले

## विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीसांचा गंभीर आरोप

**मुंबई : प्रतिनिधी**

विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि. २५) मुंबईत भाजप कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि महाविकास आघाडी सरकारवर निशाणा साधला. राज्याचे गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी सर्वपक्षीय नेत्यांची बैठक बोलावली, मात्र या गृहमंत्र्यांना काही अधिकार तरी आहेत का? मुंबईत जे काही चाललंय ते सगळे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या इशाऱ्यावर सुरू आहे, असा गंभीर आरोप करीत गृहमंत्र्यांनी बोलावलेल्या महत्त्वाच्या बैठकीला मुख्यमंत्रीच उपस्थित राहिले नाहीत. मग ही बैठक टाइमपाससाठी होती का?' असा सवाल फडणवीस यांनी या वेळी उपस्थित केला.

राज्यातील तणावपूर्ण स्थितीच्या पार्श्वभूमीवर गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे सर्वपक्षीय नेत्यांची बैठक बोलावली होती, मात्र या बैठकीला जाणे भाजपच्या नेत्यांनी टाळले. याबाबत विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस



यांनी पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका स्पष्ट करीत राज्य सरकारवर हल्लाबोल केला. ते म्हणाले की, राज्याच्या गृहमंत्र्यांनी सर्वपक्षीय बैठकीचे निमंत्रण आम्हाला दिले होते, मात्र राज्यात गेल्या चार-पाच दिवसांमध्ये ज्या काही घटना घडत आहेत त्या पाहून या सरकारने संवादाला काही जागा ठेवली आहे असे आम्हाला वाटत नाही. कोणी जर हिटलरी प्रवृत्तीनेच वागायचे ठरवले असेल, तर त्यांच्याशी संवादापेक्षा संघर्ष केलेलाच बरा, अशी आमची मानसिकता झाल्याने आम्ही या बैठकीवर बहिष्कार टाकला. (पान २ वर..)

### भोंग्यांसंदर्भात राज्य सरकार निर्णय घेऊ शकत नाही

#### गृहमंत्र्यांची सावध भूमिका

**मुंबई :** राज्य सरकार भोंग्यासंदर्भात काहीही निर्णय घेऊ शकत नाही. ज्यांनी भोंगे लावलेत, जे वापर करीत आहेत त्यांनीच विचार करायचा आहे, असे गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी म्हटले आहे. त्यामुळे या विषयावरून राज्य सरकारने सावध भूमिका घेतल्याचे मानले जात आहे.

भोंग्यांसंदर्भात सर्वपक्षीय बैठक झाल्यानंतर गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. या वेळी त्यांनी कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी सरकारची आहे. त्याचा भंग झाला, तर आवश्यक ती कारवाई पोलिसांनी करणे आवश्यक आहे या मतापर्यंत आम्ही आलो आहोत, असे सांगितले.

# पनवेलमध्ये स्थापन होणार आंतरराष्ट्रीय क्रिकेट अकादमी

## महापालिका स्थायी समितीची मंजुरी

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेलमध्ये आंतराष्ट्रीय क्रिकेट अकादमी सुरू करण्यास स्थायी समितीने सोमवारी (दि. २५) झालेल्या सभेत मंजुरी देऊन युवा क्रिकेट खेळाडू तयार करण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. या अकादमीत पनवेलमधील युवकांसाठी मोफत जागा राखीव असणार आहेत.

पनवेल महापालिकेच्या स्थायी समितीची सभा आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सोमवारी अध्यक्ष नरेश ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या वेळी सभागृह नेते परेश ठाकूर, नगरसेवक प्रकाश बिनेदार, संतोष शेट्टी, जगदिश गायकवाड व इतर सदस्य तसेच उपायुक्त कैलास गावडे, कल्पता पिंपळे आदी अधिकारी उपस्थित होते.

पनवेल महापालिका हद्दीतील




नवीन पनवेल येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट प्रशिक्षण केंद्र (अकादमी) स्थापन करण्यात येणार असून तेथे खेळाडूंना प्रशिक्षण देण्याकरिता प्रशिक्षण संस्थेची नेमणूक करण्याच्या विषयासही स्थायी समितीने मंजुरी दिली. हे प्रशिक्षण केंद्र महापालिका तयार करणार असून त्यामध्ये पनवेल मनपा हद्दीतील युवकांना मोफत जागा राखीव असणार आहेत.

## खासदार राणांप्रकरणी अहवाल देण्याचे निर्देश

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

खासदार नवनीत राणांच्या तक्रारीनंतर लोकसभा सचिवालयाने राज्य सरकारला अहवाल देण्यासंबंधी निर्देश दिले आहेत. येत्या २४ तासांमध्ये हा अहवाल द्यावा, असे निर्देश लोकसभा सचिवालयाने दिलेत.

खासदार नवनीत राणा यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना एक पत्र लिहिले असून त्यामध्ये म्हटले आहे की, आपण मागासवर्गीय असल्याने पोलिसांनी आपल्याला पाणी दिले नाही. माझ्या जातीवरून माझा पोलीस ठाण्यात छळ केला गेला. खालच्या जातीची असल्याने मला बाथरूम वापरू दिले नाही. त्याची तातडीने दखल लोकसभा सचिवालयाने घेतली आहे. लोकसभा सचिवालयाच्या निर्देशांनंतर राज्याला २४ तासांत यासंबंधी अहवाल देणे बंधनकारक आहे.



**पनवेल :** गव्हाण पंचक्रोशीतील गव्हाण, कोपर, शिवाजीनगर आणि शेलघर या चार गावांची ग्रामदेवता असलेल्या शांतादेवीची (देवी संतुबाय) दोन दिवसीय यात्रा मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने संपन्न झाली. या निमित्ताने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी गव्हाण येथील मंदिरात जाऊन शांतादेवीचे दर्शन घेतले. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, उपसरपंच विजय घरत, ग्रामपंचायत सदस्य योगिता भगत, भाजपचे कोपर अध्यक्ष सुधीर ठाकूर, रतनशेठ भगत, श्रीधरशेठ ठाकूर, वसंतशेठ पाटील, जयवंत देशमुख, अमृत भगत, उलवे नोड युवा मोर्चा अध्यक्ष साईचरण म्हात्रे, किशोर पाटील, सुहास भगत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# ३ मेच्या अल्टिमेटमवर ठाम!

## सर्वपक्षीय बैठकीनंतर मनसेची प्रतिक्रिया

**मुंबई : प्रतिनिधी**

आम्ही आमच्या भूमिकेवर ठाम आहोत. आम्हालाही कायदा सुव्यवस्था उत्तम राखायची आहे. कुठेही गालबोट लागता कामा नये ही आमची भूमिका आहे. राज ठाकरे यांनी भूमिका मांडली तेव्हा सुप्रीम कोर्टाचाच दाखला दिला होता. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे इतर धर्मीयांना मिळत आहे तशी आम्हाला परवानगी द्यावी, असे मनसे नेते बाळा नांदगावकर यांनी बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना म्हटले आहे. या वेळी बाळा नांदगावकर यांनी अल्टिमेटम कायम असल्याचं स्पष्ट केले. राज ठाकरेंनी ३ मेचा अल्टिमेटम दिला आहे.

मशिदींवरील भोंग्यांवरुन राजकारण तापलेले असताना राज्य सरकारने बोलावलेली सर्वपक्षीय बैठक सोमवारी (दि. २५) पार पडली. या बैठकीला मनसे अध्यक्ष राज ठाकरे उपस्थित नव्हते.

बैठकीनंतर बोलताना गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी भोंग्यासंदर्भात राज्य सरकार काही निर्णय घेऊ शकत नाही असे स्पष्ट केले तसेच मनसेने बैठकीत आपण अल्टिमेटम दिल्याच्या भूमिकेवर ठाम असल्याचे सांगितले नसल्याची माहिती दिली, तर दुसरीकडे बैठकीत सहभागी झालेले मनसे नेते बाळा नांदगावकर यांनी मात्र आपण भूमिकेवर ठाम असल्याचे सांगितले.

दरम्यान, आता राज्य सरकारने निर्णय घ्यायचा आहे. सुप्रीम कोर्टाने लाऊडस्पीकसंबंधी नियम सांगितले आहेत. वर्षभर लोकांना परवानगी देणार असे होत नाही, असे ते म्हणाले. भूमिकेवर ठाम आहोत, अशी भूमिका कोणीही बैठकीत मांडली नाही. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार सकाळी ६ ते रात्री १० पर्यंत भोंगे वापरायला परवानगी आहे. रात्री १० ते सकाळी ६ याच वेळेत वापरण्यावर बंदी आहे, अशी माहिती दिलीप वळसे-पाटील यांनी बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना दिली. यावर बोलताना मनसेनं आपली पहिली प्रतिक्रिया दिली आहे.

दरम्यान गेले काही दिवस सध्या 'भोंगा' प्रकरण राज्यात चांगलेच गाजत आहे. मनसेने तर आपण घेतलेल्या निर्णयावर ठाम असल्याचे म्हटले आहे. आजच्या सर्वपक्षीय बैठकीनंतर मनसे आपल्या निर्णयावर ठाम आहे. यामुळे आता मनसेच्या ३ मेच्या अल्टिमेटमनंतर पुढे काय होणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

## नगरसेवक राजू सोनी यांच्यामुळे विजेचा प्रश्न निकाली

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील पटेल मोहल्ला, कुंभारवाडा परिसरातील विद्युतपुरवठा साधारण १० ते १५ तासाच्या वर खंडीत झाला होता. याबाबतची माहिती नगरसेवक राजू सोनी यांना मिळताच त्यांनी तत्परतेने हा प्रश्न निकाली काढला आहे.



नगरसेवक राजू सोनी काही कामानिमित्त पनवेल बाहेर होते. दरम्यानच्या काळात शहरातील काही भागाचा विद्युत पुरवठा खंडित झाल्याने या संदर्भातील माहिती राजू सोनी यांना कळविण्यात आली.तातडीने त्यांनी विद्युत पुरवठा विभागाचे अधिकारी मोरे यांच्याशी संपर्क साधून त्यांना या नागरी प्रश्नाबाबत विचारले असता सदर विद्युत पुरवठा सुरू करण्यासाठी मोठ्या क्रेनची आवश्यकता असल्याने राजू सोनी यांना सांगितले. तात्काळ राजू सोनी यांनी सदर क्रेन भाड्याने देणार्या व्यक्तींशी संपर्क साधून स्वःखर्चाने भाडे भरुन ती क्रेन वीज वितरण कंपनीच्या ताब्यात दिली व त्यानंतर सदर प्रश्न क्रेनच्या सहाय्याने निकाली काढून विद्युत पुरवठा सुरळीत झाला. राजू सोनी यांनी तत्परतेमुळे या भागातील सर्व नागरिकांनी आभार मानले आहेत.

## माझा पक्ष सत्तेत येणारच

### विरोधी पक्षनेते फडणवीस यांचे पुण्यात प्रतिपादन



**पुणे : प्रतिनिधी**

आपण एकाच पक्षात राहिलो असून आणि माझा पक्ष सत्तेत येणारच, असे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी प्रसारमाध्यमाशी बोलताना सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी सोमवारी (दि. २५) पुण्यात प्रसार माध्यमांशी संवाद साधला. या वेळी ते म्हणाले होते, सत्ता गेल्यानतंर काही लोक अस्वस्थ होतात. आमचे तसे नाही, सगळे काय माझ्यासारखे नसतात, असे म्हणत विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली होती. याला सडेतोड उत्तर विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

ते पुढे बोलताना म्हणाले, जेव्हा गोष्टी जुन्या होतात तेव्हा लोक विसरतात आणि सोयीच्या गोष्टी लक्षात ठेवतात. कोणी सरकार पाडले मग पुन्हा काँग्रेसमध्ये कोण गेले? मग पुन्हा काँग्रेसचे सरकार कोणी पाडले? मग पुन्हा काँग्रेसमध्ये कोण गेले? याचा इतिहास हा सगळ्यांनी बघितला आहे. त्यामुळे काळजीचे कारण नाही. मी एकाच पक्षात आहे आणि माझा पक्ष सत्तेवर येणारच आहे. मला चिंता नाही, असेही ते म्हणाले.

## 'आरटीई' राखीव जागांवर ५१ टक्के प्रवेश निश्चित

**पुणे : प्रतिनिधी**

शिक्षण हक्क कायद्यानुसार (आरटीई) २५ टक्के राखीव जागांवरील सोडतीत (लॉटरी) निवड झालेल्या बालकांपैकी आत्तापर्यंत राज्यात ५१.८२ टक्के बालकांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. तर पुणे जिल्ह्यात प्रवेशासाठी निवड झालेल्यांपैकी ५१.४९ टक्के बालकांचे प्रवेश आत्तापर्यंत निश्चित झाले आहेत. निवड झालेल्या बालकांचे प्रवेश निश्चित करण्यासाठी पालकांना येत्या शुक्रवारपर्यंत (दि. २९) मुदत आहे.

यामध्ये निवड प्रक्रिया अशी असते. त्यानुसार आरटीईनुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि वंचित घटकातील विद्यार्थ्यांना खासगी शाळांमध्ये २५ टक्के जागा राखीव आहे. या जागांवरील प्रवेशासाठी प्राथमिक शिक्षण विभागातर्फे केंद्रीय पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबविली जाते. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता प्रवेश प्रक्रिया सध्या सुरू आहे.

प्रवेश प्रक्रियेतील सोडत यापूर्वी जाहीर झाली आहे. राज्यातील नऊ हजार ८६ शाळांमधील एकूण एक लाख एक हजार ९०६ जागांसाठी एकूण दोन लाख ८२ हजार ७८३ अर्ज आले आहेत. त्यापैकी सोडतीत राज्यातून ९० हजार ६८५ विद्यार्थ्यांची प्रवेशासाठी निवड झाली आहे. त्यातील ४६ हजार ९९५ विद्यार्थ्यांचे आत्तापर्यंत प्रवेश निश्चित केले आहेत. या प्रवेश प्रक्रियेंतर्गत पुणे जिल्ह्यातील ९५७ शाळांमधील १५ हजार १२६ जागांसाठी ६२ हजार ९६० अर्ज आले आहेत. त्यातील १४ हजार ९५८ विद्यार्थ्यांनी सोडतीत निवड झाली असून त्यातील सात हजार ७०३ विद्यार्थ्यांचे प्रवेश अद्याप निश्चित झाले आहेत.

पालकांसाठी सूचना या प्रमाणे आहेत. यात प्रतीक्षा यादीत नाव असणाऱ्या पालकांनी आता ॲडमिट कार्डची प्रिंट काढू नये. प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांचे प्रवेश प्रक्रिया सुरू झाल्यानंतर 'आरटीई पोर्टल'वर स्वतंत्रपणे सूचना देण्यात येतील. प्रवेश पात्र बालकांच्या प्रवेशासाठी पडताळणी समितीकडे जाऊन पालकांनी प्रवेशाची प्रक्रिया करावी. लॉटरी लागलेल्या बालकांच्या पालकांनी लॉटमेंट लेटरची प्रिंट काढावी. लॉटमेंट लेटर आणि आवश्यक कागदपत्रे घेऊन जवळील पडताळणी केंद्रावर जावे आणि आपला प्रवेश निश्चित करावा. पडताळणी केंद्रावर प्रवेश निश्चित झाल्याची रिसीट घेऊन मग शाळेत जावे आदि सूचना करण्यात आल्या आहेत.

## खतांवरील अनुदान दोन लाख कोटींवर

### केंद्रीय खत मंत्रालयाची आकडेवारी

**मुंबई : प्रतिनिधी**

खत निर्मितीसाठी लागणाऱ्या कच्च्या मालांच्या दरात सुमारे ६० टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. याचा परिणाम म्हणून केंद्र सरकारकडून रासायनिक खतांसाठी देण्यात येणाऱ्या अनुदानाचा आकडा आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये दोन लाख कोटी रुपयांवर जाणार आहे, अशी माहिती केंद्रीय खत मंत्रालयाने दिली.

रासायनिक खतांच्या निर्मितीसाठी पोटॅश, डाय अमेनियम फॉस्फेट (डीएपी), म्युरेट ऑफ पोटॅशच्या (एमओपी) किमतीत सुमारे ६० टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. दरात वाढ होऊनही अपेक्षित प्रमाणात कच्चा माल बाजारात उपलब्ध नसल्याचा परिणाम म्हणून टंचाई आहे. परिणामी अनेक खत कंपन्यांनी आपल्या खतांच्या किमतीत वाढ केली आहे. या वाढीव खतांच्या किमतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र सरकारकडून अनुदान दिले जाते. हे अनुदान आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये १.६ लाख कोटी रुपयांवर गेले होते. पण, सध्या जागतिक बाजारातील खतांच्या आणि कच्चा मालाच्या दरातील तीव्र दरवाढ पाहता चालू वर्षांचे म्हणजे २०२२-२३ या आर्थिक वर्षांतील अनुदान दोन लाख कोटी रुपयांवर जाणार आहे.

केंद्रीय खत मंत्रालयाच्या मते देशात रशिया, युक्रेन आणि बेलारुसकडून मोठ्याा प्रमाणावर खतांची आणि कच्च्या मालांची आयात करतो. त्यामुळे रशिया-युक्रेन युद्ध लवकर संपेल आणि खतांची आणि खत निर्मितीसाठी कच्चा मालाची आयात सुरू होईल.

## मोदी सरकारच्या आठव्या वर्षपूर्तीनिमित्त देशभर होणार विविध धार्मिक कार्यक्रम

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राज्यात एकीकडे हनुमान चालिसा पठणावरून घमासान सुरू असताना आता, मोदी सरकारच्या आठव्या वर्षे पूर्तीनिमित्त हनुमान चालिसा पठण व अन्य धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. भाजपकडून देशभरात हा उपक्रम राबविला जाणार आहे. एवढेच नव्हे तर, मंदिरांमध्ये पूजा, यज्ञ आणि हनुमान चालिसाचे पठणही केले जाणार आहे.

या अंतर्गत भाजप अध्यक्ष जेपी नड्डा यांनी आज सोमवारी (दि.२५) संध्याकाळी पक्षाच्या राष्ट्रीय सरचिटणीसांची बैठक बोलावली होती. २६ मे २०१४ रोजी नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान म्हणून शपथ घेतली आणि देशाची सत्ता भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारकडे गेली. त्या पार्श्वभूमीवर भाजपकडून याचे आयोजन करण्यात आले आहे.

गेल्या महिनाभरापूर्वीच भाजपकडून या उपक्रमाची घोषणा करण्यात आली होती. या दिवशी म्हणजेच २६ मे रोजी देशभरातील मंदिरांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. यामध्ये पूजा, यज्ञ आणि हनुमान चालिसाचे पठन केले जाणार आहे. यादरम्यान देशभरात लाभार्थी संमेलन, युवा संमेलन आणि मागासवर्गीयांसाठीचे संमेलन आयोजित केले जाणार आहे. मोदी सरकारच्या आठव्या वर्धापन दिनानिमित्त अनेक केंद्रीय मंत्री आणि नेते उपस्थित राहणार असल्याचे सांगण्यात आले.

### भाजप सरकारकडून विविध योजना

**केंद्र सरकारने देशात उज्वला, जन धन, हर घर नल अशा अनेक योजना सुरू केल्या आहेत. सरकार आपल्या सर्व योजनांच्या मदतीने देशाला नवीन भारताच्या निर्मितीकडे घेऊन जाण्याचा निर्धार केला आहे. स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने सरकार अमृत महोत्सवही साजरा करत आहे.**

पान १ वरून

## सिडकोच्या कार्यालयाला टाळे ठोकणार

नवीन पनवेलची पाण्याची ३५-३६ एमएलडी मागणी असून एमजेपीकडून ३१-३२ एमएलडी पाणी मिळते ही माहिती चुकीची असून ४२ एमएलडी पाण्याची गरज असल्याचे सर्व नगरसेवकांनी निदर्शनास आणून दिले.

सिडकोकडे पुरेसे पाणी नसताना सिडको नवीन बांधकामांना परवानगी कशासाठी देत आहे, असा सवाल करून सिडकोच्या अधिकाऱ्यांचे फक्त भूखंड विकण्याकडे लक्ष असल्याचा आरोप या वेळी उपस्थित नगरसेवकांनी केला. नवीन बांधकामांना परवानग्या देणे बंद करा, अशी मागणीही करण्यात आली. या वेळी उपस्थित अधिकाऱ्यांना पाणीपुरवठ्याबाबत माहिती नसल्याचे दिसून आल्याने चर्चा थांबवण्यात आली. त्यानंतर मोर्चासमोर बोलताना ७मेपर्यंत नवीन पनवेल व खांदा कॉलनीत पुरेसा पाणीपुरवठा न केल्यास सिडकोच्या कार्यालयाला टाळे ठोकून कर्मचाऱ्यांना आत जाण्यास मज्जाव करू, असा इशारा देऊन त्यासाठी गुन्हे दाखल झाले तरी चालतील, असे भाजपचे शहर अध्यक्ष जयंत पगडे यांनी सांगितले.

**मी नवीन पनवेल ए टाईपमध्ये राहते. आमच्याकडे सकाळी ६ ते ८.३० वाजेपर्यंत आणि संध्याकाळी ६.३० ते ७.३० वाजेपर्यंत पाणी येण्याची वेळ आहे, पण सध्या फक्त १० मिनिटे पाणी येते. संध्याकाळी तर अनेक वेळा पाणी येत नाही. फक्त फूस, फूस हवाच येते.**

**-सुनीता राऊत, रहिवासी**

## रायगडचा मिडलाईन संघ राज्यस्तरीय आमदार प्रशांत ठाकूर चषकाचा मानकरी

पारितोषिक वितरण समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील, महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे निरीक्षक मालोजी भोसले, भाजपचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष ॲड. महेश मोहिते, उत्तर रायगड जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, मिलिंद पाटील, उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, नगरसेवक हरेश केणी, प्रभाग समिती सभापती संजना कदम, नगरसेवक नितीन पाटील, विकास घरत, विजय चिपळेकर, नगरसेविका राजेश्री वावेकर, मोनिका महानवर, युवा नेते दिनेश खानावकर, दिनेश केणी, राजेश मपारा, सोपान जांभेकर, पंच प्रमुख सतिश सूर्यवंशी, सूर्यकांत ठाकूर, ज्येष्ठ कार्यकर्ते सुभाष कदम, युवा नेते समीर कदम, सतिश कदम, मंडळाचे अध्यक्ष शेखर कदम, सचिव प्रशांत कदम, खजिनदार जितेंद्र कदम यांच्यासह पदाधिकारी, ग्रामस्थ आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्रात हुतूतू, बंगालमध्ये हुडूडू, चेन्नईत चेडूयुडू केरळमध्ये वंडीवडी, उत्तर भारतात कोनवरा, साबरगण्णा, पंजाब राज्यात झाबर गंगा, सौची पक्की अशा वेगवेगळ्या नावांनी आणि थोड्याफार फरकाने हा खेळ खेळला जात होताच, पण या खेळाला सर्वदूर एकच नाव असावे याकरिता महाराष्ट्र राज्याने प्रयत्न केले आणि अनेक भाषांची ही प्रादेशिकता जाऊन भारतात हा खेळ कबड्डी या नावाने ओळखला जातो. या मैदानी खेळाने देशाच्या क्रीडा प्रकारात एक मानाची उंची राखली. या खेळाला आणि खेळाडूंना सन्मान देण्याचे काम पनवेल तालुक्यातील धरणा कॅम्प येथे झालेल्या राज्यस्तरीय आमदार प्रशांत ठाकूर चषक भव्य दिव्य कबड्डी स्पर्धेने केले. मैदानी खेळाची ही परंपरा टिकवण्यासाठी नवनवीन संकल्पना आखण्यात येतात. त्याच अनुषंगाने जणू प्रो कबड्डीचे सामने या मैदानावर होत आहेत आणि एकाहून एक सरस चढाईने यामध्ये रोमांचक थरार पहायला मिळाला. हार-जीत होतच असते, पण शिस्तबद्ध आणि सुंदर नियोजन या ठिकाणी दर्शकांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारे होते. कबड्डीतील ज्येष्ठ खेळाडूंचा सन्मानही या ठिकाणी होताना त्यांच्या प्रती आदरभाव अधोरेखित होत होता.

सूत्रसंचालन प्रो कबड्डीचे प्रसिद्ध समालोचक मिलिंद पाटील व किशोर गावडे यांनी केले. त्यांनी आपल्या वक्तृत्व शैलीने प्रेक्षकांची मने जिंकली. २२ ते २४ एप्रिलपर्यंत रंगलेल्या या स्पर्धेत अनेक सामने थरारक झाले. शेवटच्या क्षणापर्यंत निकाल काय लागणार याची उत्कंठा शिगेला पोहचली होती आणि त्याचा मनमुराद आनंद प्रेक्षकांनी अनुभवला.

***आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मनाचा मोठेपणा***

*या स्पर्धेत आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मनाचा मोठेपणा पहावयास मिळाला. स्पर्धेत सर्वोत्तम खेळाडूसाठी (मालिकावीर म्हणून) सुयोग गायकर व अभिषेक भोजने हे दोन्ही खेळाडू पात्र ठरत होते. आयोजकांनी ही गोष्ट आमदार प्रशांत ठाकूर यांना सांगितल्यानंतर दुसऱ्याच सेकंदाला आपण या स्पर्धेत दोन बाईक देतोय, असे त्यांनी जाहीर केले. कबड्डी किंवा इतर कोणत्याही खेळात सर्वोत्तम खेळाडू असेल तर बक्षीस विभागून दिले जाते, पण आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या मनाचा मोठेपणा दाखवत दुसरी बाईक देत सुखद धक्का दिला. महाराष्ट्राच्या कबड्डीच्या इतिहासात सुवर्ण अक्षराने लिहिण्याचा हा क्षण आहे. आजपर्यंत अनेक राज्य व राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत ही घटना घडली नाही, पण या स्पर्धेत आमदार प्रशांत ठाकूर यांनी हे करून दाखविले. अमाप संपत्ती असणारे अनेक नेते समाजात आहेत, पण देण्याची दानत सगळ्या लोकांकडे असतेच असे नाही. त्यामुळे संपूर्ण कबड्डीक्षेत्रातून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या दातृत्वाचे कौतुक होत आहे.*

**सविस्तर निकाल**

विजेता संघ-मिडलाईन मिडलाईन स्पोर्ट्स क्लब कर्जत-रायगड (बक्षीस एक लाख रुपये व आमदार चषक), उपविजेता संघ-दसपट्टी चिपळूण-रत्नागिरी (बक्षीस ५० हजार रुपये व आमदार चषक), उपांत्य विजयी संघ-शिवशंकर मंडळकल्याण-ठाणे (बक्षीस २५ हजार रुपये व आमदार चषक), उपांत्य विजयी संघ-गोल्फादेवी मंडळ मुंबई (बक्षीस २५ हजार रुपये व आमदार चषक), मालिकावीर सुयोग गायकर-रायगड (दुचाकी मोटरसायकल) आणि अभिषेक भोजने, रत्नागिरी (दुचाकी मोटरसायकल), उत्कृष्ट चढाई-ओमकार कदम, रत्नागिरी (बक्षीस १० हजार रुपये व चषक), उत्कृष्ट पकड-प्रतिक बैलमारे, रायगड (१० हजार रुपये व चषक), पहिला दिवसाचा मानकरी-संतोष हिप्परकर, सांगली (पाच हजार रुपये आणि चषक) दुसऱ्या दिवसाचा मानकरी-विनोद आत्तलकर, मुंबई शहर (पाच हजार रुपये आणि चषक), उदयोन्मुख खेळाडू-सिद्धेश पिंगळे, गोल्फादेवी मंडळ मुंबई (पाच हजार रुपये आणि चषक).

**या गावातून अनेक खेळाडू महाराष्ट्राच्या संघाला मिळाले आहेत. त्यामुळे त्या खेळाडूंची इच्छा होती की येथे राज्यस्तरीय स्पर्धा व्हावी. त्या अनुषंगाने ही बाब आमदार प्रशांत ठाकूर व सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याकडे मांडली. त्यांनी ताबडतोब होकार दिला आणि त्यांच्या माध्यमातून या स्पर्धेचा बहुमान त्यांनी जय भवानी नवतरुण मंडळाला दिला. त्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर, सभागृह नेते परेश ठाकूर यांचे विशेष आभार मानते.**

**-संजना कदम, सभापती, प्रभाग समिती 'अ', पनवेल महानगरपालिका**

## मुख्यमंत्र्यांच्या इशाऱ्यावरूनच मुंबईत हल्ले -फडणवीस

सत्ताधारी पक्षाचे कार्यकर्ते पोलीस संरक्षणात आमच्या नेत्यांवर हल्ले करीत असतील आणि त्यानंतरही एफआयआर दाखल करण्यासाठी आम्हाला संघर्ष करावा लागत असेल, तर अशा बैठकांना जाऊन फायदा काय, असे म्हणत फडणवीस यांनी ठाकरे सरकारवर टीका केली.

फडणवीस पुढे म्हणाले की, किरीट सोमय्यांवर हल्ला झाला. पोलिसांच्या समक्ष झेड सुरक्षा असलेल्यावर हल्ला केला जातो. मोहीत कंबोज यांच्यावर मॉब लिंचिंगचा प्रयत्न झाला. या सगळ्या गोष्टी आपण जर बघितल्या तर हे मुंबईतच सुरू आहे असे नाही. राज्यात सर्वदूर भाजपच्या नेत्यांना, कार्यकर्त्यांना लक्ष्य करून त्यांच्यावर केसेस नोंदवल्या जात आहेत. मग कधी प्रवीण दरेकरांवर केस टाकली जाते, उच्च न्यायालयाने दिलासा दिला तर उच्च न्यायालयावर आरोप केला जातो. इतक्या खालच्या स्तरावर आता ही नेतेमंडळी पोहचली आहे. रणजितसिंग नाईक-निंबाळकरांविरोधात आठ खोट्या तक्रारी केल्या गेल्या, एकाही तक्रारीत दम नाही. पोलिसांचा दुरुपयोग मोठ्या प्रमाणावर चालला आहे. यांची एकही केस टिकली नाही, टिकूच शकत नाही, कारण धादांत खोट्या केसेस टाकणे सध्या सुरू आहे.

**भ्रष्टाचाराविरोधात लढाई सुरुच राहील!**

*महाराष्ट्रात अशा प्रकारची स्थिती आम्ही कधीच पाहिली नाही की, सरकार पक्षाचे लोक पोलीस संरक्षणात विरोधी पक्ष आपल्या भ्रष्टाचारावर बोलतो म्हणून जीवे मारण्याकरिता हल्ला करीत आहेत. आम्ही पोलखोल यात्रा काढली. या यात्रेच्या माध्यमातून मुंबई महापालिकेतील सगळा भ्रष्टाचार आम्ही लोकांसमोर मांडला. लोकशाहीमध्ये यापेक्षा वेगळे काय करायचे असते? त्यांनी आमच्या पोलखोल यात्रेवर आणि रथावर हल्ला केला. सत्ताधाऱ्यांना असे वाटत आहे की हल्ले करून आम्ही त्यांच्या भ्रष्टाचारावर बोलायचे थांबू, मात्र आम्ही थांबणार नाही. भ्रष्टाचाराच्या विरोधातील लढाई सुरूच राहील, असे म्हणत विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी राज्य सरकारला इशारा दिला आहे.*





पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**मंगळवार, दि. २६ एप्रिल २०२२ रोजी होणारे**

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स**

**सर्व केंद्रांवर (वयोगट :** १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल ■ ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पुर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

**ग्रामिण लसीकरण**

■ काळुंद्रे ■ तळोजा ■ असुडगाव ■ पालेखुर्द ■ रांजणपाडा/पेठ ■ धानसर/तुर्भे

**ग्रामिण लसीकरण सत्रांत दि. १८.०४.२०२२ पासून तक्त्यात नमूद केलेल्या गावामध्ये वयोगट १२-१४ यांस कार्बेव्हॅक्स व १५ ते १८ वयोगटातील लाभार्थ्यांसाठी कोव्हीक्सिन लस उपलब्ध असणार आहे.**

**Precautionary Dose बाबत माहिती**

- शासकीय कोविड लसीकरण केंद्रांमध्ये ६० वर्ष वरील नागरीकांना, तसेच FLW, HCW यांना दुसरा डोस घेऊन ९ महिने(३९ आठवडे/२७३ दिवस) झालेल्या लाभार्थ्यांना Precautionary Dose पुर्वी प्रमाणेच उपलब्ध होणार आहे.
- दि. १०.०४.२०२२ पासून सर्व खासगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये १८-५९ वर्ष (Year of birth 1963-2004) वरील नागरीकांचे दसरा डोस घेऊन ९ महिने(३९ आठवडे/२७३ दिवस) झालेल्या नागरीकांना Precautionary Dose उपलब्ध होणार आहे.
- खासगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये लसीकरण **सशुल्क** असणार आहे.
- **१८-५९** वय नागरीकांचे Precautionary Dose हे **फक्त खाजगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये** उपलब्ध असेल.
- या लसीकरणाकरीता **कुठलेही नविन रजिस्ट्रेशन** करण्याची आवश्यकता नाही.
- **१८-५९** वय नागरीकांचे Precautionary Dose च्या लाभार्थ्यांनी दुसऱ्या डोस चे सर्टिफिकेट/दुसरा डोस घेताना वापरलेला ID Proof व दुसऱ्या डोस करीता दिलेला मोबईल नंबर लसीकरण केंद्रावर सोबत घेऊन जावा.
- या लसीकरीताची शुल्क रु. २२५+GST + रु. १५० पर्यंत सर्विस शुल्क शासनाने ठरविले आहे. लागणार आहे. मामाजबाबदारा

नागरीकांना लस घेताना पहिले दोन डोस ज्या लसीचे घेतले आहेत तीच लस Precautionary Dose साठी घ्यावी लागणार आहे.

- लाभार्थ्यांना कोविन अँप वर कोणत्या खासगी लसीकरण केंद्रांवर लसीकरण सुरु आहे हे दिसणार आहे त्याप्रमाणे कोविन वर Online Booking करुन किंवा प्रत्यक्ष लसीकरण केंद्रांवर देखील Booking करुन लस घेता येईल.

# पनवेल मनपा स्थायी समितीच्या बैठकीत विविध विषयांना मंजुरी



## वाढीव खर्चाचा विषय स्थगित

**महानगरपालिका क्षेत्रातील (पनवेल शहर वगळता) पाणीपुरवठा परिचालनासाठी व देखभाल दुरूस्तीकरिता मुनष्यबळ पुरविण्याच्या कामाकरिता सुधारित वाढीव खर्चाला व महानगरपालिका हद्दीतील जुने पनवेल शहर येथील जलशुद्धीकरण केंद्र व उच्चस्तरीय जलकुंभ तसेच देहरंग धरण व वितरण नेटवर्क परिचालनासाठी मनुष्यबळ पुरविण्याच्या कामाकरिता वाढीव खर्चाचा विषय स्थायी समितीने स्थगित केला.**

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिकेच्या स्थायी समितीची सभा क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सोमवार (दि. २५) सकाळी ११.३० वाजता अध्यक्ष नरेश ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या सभेत विविध महत्त्वाच्या विषयांना मंजुरी देण्यात आली.

या वेळी सभागृह नेते परेश ठाकूर, प्रकाश बिनेदार, संतोष शेट्टी, जगदीश गायकवाड, विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, गणेश कडू, अरविंद म्हात्रे, सतीश पाटील व इतर सदस्य, उपायुक्त कैलास गावडे, कल्पता पिंपळे व इतर अधिकारी उपस्थित होते. महापालिका क्षेत्रातील आरटीपीसीआर केंद्रामध्ये लागणाऱ्या मनुष्यबळाच्या दरास मान्यता देणे, पनवेल महानगरपालिकेचा तीन वर्षांचा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल तयार करण्याचे काम पर्यावरण विज्ञान आणि अभियांत्रिकी विभागास देणे, आयआयटी बॉम्बे या संस्थेस देण्याच्या विषयास मंजुरी देण्यात आली.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील समिती क, प्रभाग क्र.१३मधील जुई गावामध्ये मल:निस्सारण वाहिन्या टाकणे, पंम्पिग स्टेशन बांधणे, मलप्रक्रिया केंद्र उभारण्यास व पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती अ मधील ओवे कॅम्प गावातील मुख्य रस्त्याचे डांबरीकरण, प्रभाग समिती ब मधील वळवली गावात रस्ता डांबरीकरण करण्याच्या कामाला तसेच प्रभाग क्र.१९मधील गुरुशरणम इमारती समोरील रस्त्याचे व पावसाळी गटाराचे उन्नतीकरण करण्याच्या कामास स्थायी समितीने मंजुरी दिली.

पनवेल महानगरपालिका अंतर्गत क्षेत्रामध्ये पिण्याच्या पाण्याचे टँकर भाडे तत्त्वावर पुरविण्याच्या कामाकरिता वाढीव खर्चास सुधारीत प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देण्यात आली. महानगरपालिका क्षेत्रात मूलभूत सोयीसुविधांच्या विकासासाठी तरतूद योजनेअंतर्गत व महानगरपालिका निधीतून भिंगारी येथे प्राथमिक शाळा चार वर्गखोल्या बांधण्याला मंजुरी दिली.

महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती अ-प्रभाग क्र.२ देवीचापाडा येथे गटार, रस्ता डांबरीकरण आणि समाजमंदिराचे बांधकाम करणे, पेंधर गावातील रस्त्यांचे काँक्रीटीकरण व गटार बनविणे, पालेखुर्द गावातील गणेश मंदिर ते स्मशानभूमीपर्यंत रस्त्यांचे डांबरीकरण करणे व आरसीसी गटार बांधणे, घोटचाळ गावातील रस्त्यांचे काँक्रीटीकरण प्रभाग समिती क प्रभाग क्र. १४ मधील भूखंड क्र.०४, सेक्टर-१६, नविन पनवेल (प) या भूखंडावर पनवेल महानगरपालिका मुख्यालय बांधणे या कामाच्या वास्तूविशारद, सल्लागारांच्या फीबाबत व महानगरपालिका मालकीच्या पथदिव्यांची दोन वर्षांकरिता निगा, दुरूस्ती, परिचलन, सुधारणा व नूतनीकरण करणे महानगरपालिका क्षेत्रात मूलभूत सोयीसुविधांच्या विकासासाठी तरतूद योजनेअंतर्गत व महानगरपालिका निधीतून मुर्बी (खारघर) येथील प्राथमिक शाळा तीन वर्गखोल्या बांधणे, महानगरपालिका क्षेत्रात मूलभूत सोयीसुविधांच्या विकासासाठी तरतूद योजनेअंतर्गत व महानगरपालिका निधीतून वळवली येथील प्राथमिक शाळा तीन वर्गखोल्या बांधण्याच्या कामास स्थायी समितीने मंजुरी दिली.








**पनवेल : पाणी प्रश्नासंदर्भात झोपलेल्या सिडकोला जागे करण्यासाठी भारतीय जनता पक्षातर्फे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी मडका फोड आंदोलन करण्यात आले. नवीन पनवेलमधील अग्निशमन केंद्रापासून निघालेल्या या मोर्चात भाजप ओबीसी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष नगरसेवक मनोज भुजबळ, शहराध्यक्ष जयंत पगडे, आजी-माजी नगरसेवक, नगरसेविका, पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सिडको गेटवर पोलिसांनी मोर्चा अडवल्यावर सिडकोविरोधात घोषणा देत मोर्चेकाऱ्यांनी आपल्या हातातील मडकी गेटसमोर फोडली.**

## एसटीच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची सभा

**उरण : प्रतिनिधी**

उरण, पनवेल एसटी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची सभा नुकतीच पनवेल बसस्थानकात चंद्रकांत आनंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. सभेला ८८ सेवानिवृत्त एसटी कर्मचारी उपस्थित होते. प्रथम मृत पावलेल्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर सर्व निवृत्त उपस्थित कर्मचाऱ्यांचे संघटनेमार्फत स्वागत करण्यात आले.



उपाध्यक्ष एन. ए. चव्हाण यांनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, सध्या अस्तित्वात असलेली कमिटीच २०२२पर्यंत कार्यरत राहिल, तसा प्रस्ताव त्यांनी मांडला. त्या प्रस्तावाबाबत बी. बी. पाटील यांनी सर्वांची मते जाणून घेतली. सेवानिवृत्त सर्व कर्मचाऱ्यांनी त्या प्रस्तावास एक मताने संमती देत प्रस्ताव स्वीकारला, प्रस्तावाला कुठलाही विरोध करण्यात आला नाही. संघटनेचे सल्लागार ॲड. विद्याधर मोकल यांनी नवीन सभासदांची नोंदणी करून घेतली.

या वेळी सी. आर. काळे, एच. आर. नाईक, गिरीश ठाणगे, मधुकर शिंदे, शैला पितळे, सीमा देशमुख, के. पी. म्हात्रे, आशा विलवर्ण, येराडकर, प्रकाश लाखण, अनिल झिराडकर, ए. एम. चौधरी, एस. एस. शिंदे, एस. के. म्हात्रे, एस. बी. सावळकर, तुकाराम पाटील, के. एस. पाटील, नितीन वेदक, एकनाथ पाटील, राहुल सोनावणे आदी उपस्थित होते.

## टँकरच्या धडकेने एक जण जखमी

**पनवेल : वार्ताहर**

एका टँकरची धडक बसल्याने एक जण जखमी झाल्याची घटना तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये घडली. तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये एका ट्रान्सपोर्टमध्ये क्लिनरचे काम करणारा मोरारी ठाकूर (वय २२) याला टँकरसमोरील फिडल पंप बटन क्लिनर शेर बहादूर यादव याने दाबायला सांगितले असता, त्याला टँकरचा धक्का लागल्याने मोरारी ठाकूर हा जखमी झाला. या घटनेची नोंद तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## पनवेल मनपाच्या चित्रकला स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : प्रतिनिधी**

येथील महानगरपालिकेच्या वतीने स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सवा अंतर्गत माझी वसुंधरा दिनानिमित्त ध्वनी-वायू-जल प्रदूषण नियंत्रण अभियानाच्या निमित्ताने भव्य चित्रकला स्पर्धा माजी आमदार दत्तूशेठ पाटील विद्यालय कामोठे येथे उत्साहात झाली. या स्पर्धेस १५० विद्यार्थ्यांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला.

स्पर्धा ३ गटांमध्ये घेण्यात आली. पहिला खुला गट, दुसरा गट ७वी ते १०वी आणि तिसरा १ली ते ६वीमध्ये स्पर्धा झाली. सर्व सहभागी स्पर्धकांना सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. उपायुक्त विठ्ठल डाके यांच्या मार्गदर्शनाखाली विजेत्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळा प्रशासन तसेच अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी विशेष सक्रिय सहभाग घेतला.



### असे आहेत विजेते

**गट १ (खुला गट)**

प्रथम क्रमांक : काव्यश्री म्हात्रे
द्वितीय क्रमांक : सरस्वती भवन पटेल
तृतीय क्रमांक : शिवांजली मुकुंदराव जाधव

**गट २ (इयत्ता सातवी ते दहावीपर्यंत)**

प्रथम क्रमांक: श्रद्धा संतोष लिंगे
द्वितीय क्रमांक: देवयानी सुदेश शिंदे
तृतीय क्रमांक: श्लोक संदीप सकपाळ

**गट ३ (इयत्ता पहिली ते सहावीपर्यंत)**

प्रथम क्रमांक : शामभवी पंकज गुप्ता
द्वितीय क्रमांक : अनमोल औटी
तृतीय क्रमांक : अनुष्का विकास वायकर



पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अद्वैत देशमुख याला त्याच्या ११व्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, वैशाली देशमुख, जयवंत देशमुख, जयश्री देशमुख, वैभव देशमुख, भाग्यश्री देशमुख, अमोल देशमुख, दिप्ती देशमुख आदी उपस्थित होते.



पनवेल : गव्हाण पंचक्रोशीतील गव्हाण, कोपर, शिवाजीनगर आणि शेलघर या चार गावांची ग्रामदेवता असलेल्या शांतादेवीच्या (देवी संतुबाय) यात्रेनिमित्त भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट दिली. या वेळी उपसरपंच विजय घरत यांच्यासह पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.



पनवेल : येथील जाखमाता गावदेवीच्या पालखी सोहळ्याला महापालिकेच्या नगरसेविका दर्शना भोईर यांनी भेट देऊन दर्शन घेतले.



पनवेल : महापालिकेच्या गुजराथी शाळेत शाळा पूर्वतयारी मेळावा सोमवारी उत्साहात झाला. या वेळी नगरसेविका दर्शना भोईर यांनी सहभाग घेतला. त्यांच्यासह मुख्याध्यापिका वैशाली संजय त्रिवेदी, शिक्षिका डिंपल ठक्कर, श्वेता मरगज, मोसमी गोडकाई आदी उपस्थित होते.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : १८

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअ‍ॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).

**१. आपण कर्जदार असाल तर कोणते कर्ज आधी फेडणे फायद्याचे आहे?**

***अ.*** गृह कर्ज — ***आ.*** कारवरील कर्ज
**इ.** क्रेडीट कार्डवर घेतलेले कर्ज — **ई.** इन्शुरन्स पॉलिसीवर घेतलेले कर्ज

**२. शेअर बाजाराच्या गुंतवणुकीचा लाभ घेण्यासाठीचा सर्वात सुरक्षित मार्ग कोणता?**

***अ.*** डे ट्रेडिंग — ***आ.*** पोझिशनल ट्रेडिंग
**इ.** फ्युचर अँड ऑप्शन — **ई.** म्युच्युअल फंड

**३. उत्पन्न सुरु झाल्यावर सर्वात आधी कोणती गुंतवणूक केली पाहिजे?**

***अ.*** आरोग्य विमा — ***आ.*** घर खरेदी
**इ.** एलआयसी पॉलिसी — **ई.** शेअर बाजार

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# चौथ्या लाटेची चाहूल?

**देशात गेल्या २४ तासांत कोरोनाच्या २ हजार ५४१ केसेस नोंदल्या गेल्या आहेत, यापैकी १ हजार ८३ केसेस या एकट्या दिल्लीतील आहेत. कोरोना महासाथीशी संबंधित देशभरातील वाढती आकडेवारी सगळ्यांचीच चिंता वाढवणारी असून या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी बुधवारी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी संवाद साधणार आहेत.**

गेल्या आठवड्यात देशभरात नोंदल्या गेलेल्या कोविड केसेसपैकी दोन तृतियांश केसेस या उत्तरेतील दिल्ली, हरयाणा आणि उत्तर प्रदेशातील आहेत. याच काळात महाराष्ट्रात केसेसमध्ये ४८ टक्के, कर्नाटकात ७१ टक्के, तामिळनाडूत ६२ टक्के, पश्चिम बंगालमध्ये ६६ टक्के तर तेलंगणामध्ये २४ टक्के वाढ दिसून आली आहे. या आठवडाभरात देशातील उपचाराधीन रुग्णांची संख्या ११ हजार ५०० वरून १६ हजार ३०० वर गेली आहे. गेल्या दोन आठवड्यांतील बदलती परिस्थिती लक्षात घेण्याकरिता पंतप्रधान नरेंद्र मोदी बुधवारी (२७ तारखेला) सर्व मुख्यमंत्र्यांशी यासंदर्भात व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारा चर्चा करणार आहेत. गेले सलग तीन दिवस दिल्लीत रोज हजारापेक्षा अधिक कोरोना केसेसची नोंद झाली आहे. तेथील पॉझिटिव्हिटी रेट ४.४८ टक्के असला तरी हॉस्पिटलमध्ये ऑक्सिजनची गरज भासणाऱ्या रुग्णांची संख्या सातत्याने वाढते आहे. केंद्र सरकारने गेल्याच आठवड्यात महाराष्ट्रासह काही राज्यांना सावधगिरी बाळगण्याच्या सूचना दिल्या आहेत. दिल्ली आणि उत्तर प्रदेशात मास्क वापरणे पुन्हा सक्तीचे झाल्यानंतरही महाराष्ट्रात मात्र मास्क वापराची पुन्हा सक्ती करण्याची गरज नसल्याचे राज्य सरकारकडून अलीकडेच सांगण्यात आले. गर्दीच्या आणि सार्वजनिक ठिकाणी नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी असे आवाहन राज्याच्या आरोग्यमंत्र्यांनी केले. परंतु नुकतीच मास्कमधून सुटका झालेली महाराष्ट्रातील जनता मास्क वापराकडे पुन्हा वळण्याच्या मन:स्थितीत दिसत नाही. राज्य सरकारने निव्वळ मास्क-सक्तीपोटी आकारला जाणारा दंड रद्द केला आहे. मास्क वापरू नये असे सरकारने म्हटलेले नाही असा युक्तिवादही आघाडी सरकारकडून करण्यात आला. परंतु हे असे म्हणणे युक्तिवादाकरिता सोयीचे असले तरी पुन्हा जनतेला कोरोना प्रतिबंधक खबरदारीकडे वळवण्याची जबाबदारी राज्य सरकारचीच आहे याचे भान ठाकरे सरकारने ठेवलेले बरे. निव्वळ खुर्च्या टिकवण्याकरिता कुरघोडीचे राजकारण करण्यात मश्गुल असलेल्या या तीन चाकी सरकारकडून या आघाडीवर दिरंगाई झाल्यास राज्यातील जनता पुन्हा महामारीच्या विळख्यात जाण्यास वेळ लागणार नाही. सध्याची केसेसची वाढती संख्या हा ओमायक्रॉनच्या नव्या विषाणूचा परिणाम आहे की दुसऱ्या डोसला बराच काळ लोटल्यामुळे लोकांची प्रतिकारशक्ती कमी पडू लागली आहे. याविषयी तज्ज्ञांमध्ये गोंधळाचे वातावरण आहे. तूर्तास कोरोना मृतांच्या संख्येमध्ये फारशी वाढ दिसत नाही ही एक दिलाशाची बाब आहे. महाराष्ट्रापुरते बोलायचे झाले तर राज्यात तिसऱ्या (बूस्टर) डोससाठी जनतेमध्ये फारशी उत्सुकता दिसलेली नाही. पालघरमध्ये १०० टक्के तर मुंबईत ९७ टक्के ज्येष्ठ नागरिकांनी लशीचा बूस्टर डोस घेतला आहे. रायगड जिल्ह्यात हे प्रमाण ९४ टक्के इतके आहे तर ठाणे, जळगावमध्ये ते अनुक्रमे ९३ व ९२ टक्के आहे. उर्वरित जिल्ह्यांमध्ये मात्र हे प्रमाण कमालीचे कमी आहे. एकंदरीत ढिसाळ कारभाराचीच सवय अंगवळणी पडलेल्या महाविकास आघाडी सरकारला यासंदर्भात वेळीच जाग आणण्यासाठी नेहमीप्रमाणे विरोधकांनाच प्रयत्न करावे लागतील असे दिसते.

# दाभोळचा धक्का कात टाकतोय..!

दाभोळ हे शब्द गुगलवर टाईप करताच जी लिखित स्वरूपात माहिती मिळते त्यामुळे पर्यटकांना आकर्षित करेल अशी अनेक दृष्ये त्यांत नमुद केलेली दिसतील. लिखित ऐतिहासिक माहितीसुद्धा मिळेल, पण जी माहिती आज या लेखाद्वारे मी आपणास शेर करू इच्छितो ती कायम माझ्या हृदयी कोरली गेलेली काहीशी भावनिक आहे. हा लेख फ़क्त दाभोळ धक्का इथवर सीमित आहे. कदाचित कोकणप्रेमी वाचकांना तो अवश्य भावेल.



दाभोळ भौगोलिक दृष्टीने आज तसाच आहे जसा तो पूर्वीच्या शतकात असायचा. वाशिष्ठी नदीचे अवाढव्य जलपात्र माणूस बघाताक्षणी अवाक होऊन जातो, नव्हे तो भावूक होऊन जातो. गंगेची अवाढव्य खोरी जशी अजरामर आहेत, तशीच वाशिष्ठी नदीच्या जलपात्राविषयी बोलता येईल. कुठून येई कुठवर जाई अशी या वाशिष्ठी नदीची मनस्वी नवलाई आहे. नदी ज्या ठिकाणी अरबी समुद्रात येऊन मिळते नेमकी तीच जागा दाभोळच्या धक्क्यासाठी त्यावेळच्या तज्ञांनी का निवडली असणार? हा संशोधनाचा विषय होऊ शकतो, पण दाभोळ धक्का ही संपूर्ण पंचक्रोशीची शान समजली जाते. रात्री-अपरात्री धक्क्यानजीक अनेक डिपको, होड्या, लाँच नांगर करून असतात. लोकांची ये-जा असते. म्हणजे काय तर सर्वत्र कायम गजबजून गेलेला हा धक्का आणि त्याचा परिसर आजही पंचक्रोशीच नव्हे तर वाशिष्ठी पात्रानजीकची सर्व गावे आकर्षित झाली आहेत. तिचे उगम स्थान चिपळूण व मध्येच तिला येऊन मिळणारी नारिंगी नदी, समोरचा गुहागर तालुका सर्वांचे आकर्षण ते फ़क्त आणि केवळ दाभोळ धक्का होय यात दुमत नसावे.

एकेकाळी जेव्हा खुष्कीचा मार्ग आजसारखा सहज सोपा नव्हता तेव्हा जलमार्ग हाच केवळ दळणवळण मार्ग म्हणून सर्वांना ज्ञात होता. त्यावेळी गलबते, वल्ह्यावरील होड्या, मचवे अशी इंधनाव्यतिरिक्त चालणाऱ्या वाहनांचाच उपयोग केला जात असे. आता त्याची जागा आगबोटी, लाँच, डिपको, इंधन मालवाहू तसेच पेसेंजर यांनी घेतली आहे. माणूस जसा प्रगत होत जातो तसतसे बदल हे येणारच! मुद्दा असा की, आज जेथे दाभोळ धक्का अस्तित्वात आहे, ते नंतरचे वाढीव काम होय. तत्पूर्वी धक्का आत होता. जेव्हापासून मुंबईहुन पेसेंजर बोटीची सेवा कायमस्वरूपी थांबली त्यानंतर धक्क्याकडे विशेष कुणी लक्ष दिले नाही.

मी स्वतः अनेकदा मुंबई भाऊचा धक्का ते दाभोळ बंदर असा प्रवास अनेकदा केला आहे. शेवटी चौगुले शिपिंग कंपनीच्या बोटी कोकण सेवकने सुद्धा प्रवास केला. तोवर दाभोळ धक्क्याची शान काही निराळीच होती. त्यानंतर तो धक्का उदास दिसू लागला. कालांतराने फक्त वाशिष्ठी नदी खोऱ्यातील जनसामान्यांना ने-आण करणाऱ्या किस्मत, अरमान मिनी बोटींना आणि इतर अंजनवेल येथील प्रवासी डीपकोना लाँगसाईड होण्यातच समाधान मानावे लागते. शोभना बोट मुंबईस गेल्यानंतर त्याजागी प्रवासी वाहतूक म्हणून मीरा मिनीबोट दाभोळला येऊन दाखल झाली. जी वाशिष्ठी खोऱ्यातील दोन्ही पर्वताच्या कुशीतील गावामधून प्रवाशांना दाभोळला ने-आण करायची. मीरा बोटीने मी एकदा पांगारी गावी प्रवास केलेला आठवतो. कदाचित पाचवी इयत्तेत असेन. कोळथरे गावचे गनी मुकादम त्यांत क्रु मेंबर म्हणून नोकरीत होते. त्यांनीच मला जबाबदारीने माझ्या तेथील नातेवाईकांच्या स्वाधीन केले. नंतर बऱ्याच वर्षांनी नात्यातल्या एका मुलीच्या लग्नात चिवेली या गावी बोटीने गेलो होतो.

उंबरघर हा तसा डोंगराळ प्रदेश, पण तेथे जाण्यासाठी म्हणून दाभोळ धक्क्याचाच आधार असायचा. आता त्यागावी जाण्यास गाडी रस्ता झाला आहे, हे विशेष! नवसे या गावी तर अनेकवेळा बोटीने जाणे-येणे झाले कारण त्या शेजारीच भारती शिपयार्डमध्ये मी नोकरी केली. अनेक शहरी जहाजांना ये-जा करताना पाहिले, अनुभवले. त्यावेळी उत्तरोत्तर दाभोळ धक्क्यावरील वर्दळ पुन्हा पूर्वपदावर आली. आजही तेच चित्र दिसेल. विशेष म्हणचे फेरीबोट सुरू झाल्याने दोन तालुके म्हणजेच दापोली ते गुहागर येथील दळणवळण मार्ग जोमात सुरू झाला. ज्यामुळे आज अनेक पर्यटक याच फेरीबोटीने (दाभोळ ते वेलदुर) प्रवास करु लागलेत. ते थेट रत्नागिरीपर्यंत प्रवास कमी वेळात होतो, म्हणुनही असू शकेल. मात्र पर्यटन हळूहळू आकार घेत आहेत. तेही तितकेच खरे.ज्यावेळी सेंट अँथनी, रोहिदास, चँपावती, रत्नागिरी या पेसेंजर बोटीतून लोक तसेच इतर सामान आणि सिझनचा हापूस आंब्याची वाहतूक केली जात असे.

दाभोळ धक्का हे प्रमुख ठिकाण त्या काळापासून महशूर होते व आजही त्याची ख्याती जगभर आहे. सध्या मोठ्या बोटीमधून दळणवळण पूर्ण बंद झाले असले तरीही आंबा वाहतूक जलमार्गाने जास्त सोयीस्कर होऊ शकेल कारण हापूस फळ अतिशय नाजूक, त्याची नजाकत जपायची असेल तर जलप्रवास उत्तम! याच धक्क्या ठिकाणी त्या काळी चार-दोन हॉटेल होती. समोरच मस्जिद होती व ती आजही आहे. घाऊक माल बोटीने किंवा गलबताने दाभोळला आणला जायचा. मोठी बाजारपेठ होती, आर्थिक उलाढालीचे प्रमुख केंद्र म्हणजे फक्त दाभोळ धक्का होय! मच्छी लिलाव मोठ्या प्रमाणात व्हायचे, जे आजही होते. नंतर हेलिफिशरीज आले. कालांतराने तेही निघून गेल. खानावळी आल्या, बँका आल्या. जेथे प्रवाश्यांसाठी म्हणून धर्मशाळा असायची. त्याजागी आता शासकीय कार्यालयांच्या वास्तू आल्या आहेत.

दाभोळ-मुंबई तिकीट घर होते ज्यामध्ये चिपळूणचे अहमद दळवी यांचे कार्यालय होते. दळवी हे तिकिट मास्टर म्हणून नोकरीत होते. जे मूळचे पांगारीचे, दाभोळून जेव्हा त्यांची बदली गोवळकोट येथे झाली त्यानंतर ते तेथेच स्थायिक झाले, असे मुंबई विद्यापीठाचे इतिहास तज्ञ आणि विभाग प्रमुख, संशोधक (आज वय वर्षं ९० सुमारे) सत्तार दळवी हे सांगतात. डॉ. दळवी याच मातीतले असून त्यांच्या बालपणीच्या दाभोळ येथील आठवणी ते अतिशय भावूक होऊन सांगतात. दाभोळचे स्थानिक सोमण, शशिकांत आणि जहांगीर यांची हॉटेल कम दुकाने असायची. एसटी स्टँड होते जे आजही तेथेच आहे. पोलीस स्टेशन होते. काही काळ निळी एसटी दाभोळ पर्यंत न येता वर घाणीच्या वाकणात उभी रहायची. धक्क्या नजीकच बैलगाडी सेवा उपलब्ध होती. बैलगाड्या बोटीवरील प्रवाश्यांचे सामान घेऊन घाणीच्या वाकणापर्यंत जायच्या. दाभोळ ते कोळथरे ३९ नये पैसे (हाफ) तिकीट असायचं. गाडी ५५ सीटर असली तरीही साठपेक्षा जास्तच प्रवासी एसटीत कोंबलेले असायचे. साऱ्यांची दमछाक व्हायची. पण गावाकडची ओढ असायची म्हणून तो गाडी प्रवास सुद्धा सुखकर वाटायचा.

दाभोळ धक्का आजही तेथेच आहे पण गेल्या अनेक वर्षात त्याची डागडुजी किंवा त्याचे परिसराचे सुशोभीकरण करण्यात शासकीय यंत्रणा खूपच कमी पडली आहे. आत्ता तशी जाग आल्याचे ऐकीवात आहे व सिमेंटिंग काम जोरात सुरू आहे. खरंतर अशा या ऐतिहासिक बंदराची निगा राखणे अत्यावश्यक आहे. संपूर्ण परिसर सुशोभित केला गेल्यास पर्यटक तसेच पंचक्रोशीतल्यांना आनंद होईल. रोड ट्रॅफिक पेक्षा जलप्रवास जास्त आनंद देणारा आहे.

फेरीबोटच्या माध्यमातून किंवा इतर बोटीतून नदी पात्रात नाईट लाईफ सुद्धा सुरू करणे गरजेचे आहे. अर्थातच या करिता नदी पात्रातला पाण्याचा समा (प्रवाह) जाणूनच तसा निर्णय घेणे शक्य होईल. संबंधित शासकीय यंत्रणेने तज्ञांचा सल्ला घ्यावा. स्थानिकांना रोजगार मिळेल आणि पर्यटकांसाठी केलेल्या सुविधांचा पंचक्रोशीतील इतरांना ही लाभ होऊ शकेल. दाभोळ हे बंदर धक्का होण्यापूर्वीसुद्धा असेच गजबजलेले होते याचा अर्थही भूमी कमर्शियल हब म्हणून पुर्वकाळापासून ओळखीची आहे तशी ऐतिहासिक नोंद आहेच. यावर तज्ञ मंडळींनी विचार करून निर्णय घ्यावा व तो त्वरित अमलात यावा, एवढीच विनंती.

**-इक्बाल मुकादम**

## बदलते तंत्रज्ञान




### सबस्क्रायबर्ससाठी नेटफ्लिक्सची अनोखी योजना

जे उपभोक्ते कुटुंबाव्यतिरिक्त इतरांसोबत आपले खाते शेअर करत असतील त्यांच्यासाठी नेटफ्लिक्सने नवा नियम जारी केला आहे. व्हिडीओ स्ट्रीमिंग सेवा देणारी कंपनी नेटफ्लिक्सचे २ लाखांहून अधिक ग्राहक कमी झाले आहेत.

व्हिडीओ स्ट्रीमिंग सेवा देणारी कंपनी नेटफ्लिक्सचे दोन लाखांहून अधिक ग्राहक कमी झाले आहेत. यानंतर आता नेटफ्लिक्सने पुनरागमन करण्यासाठी एक वेगळीच योजना आखली आहे. जे उपभोक्ते कुटुंबाव्यतिरिक्त इतरांसोबत आपले खाते शेअर करत असतील त्यांच्यासाठी नेटफ्लिक्सने नवा नियम जारी केला आहे. टेक क्रंचच्या मते, कंपनीने मार्चमध्ये चिली, कोस्टारिका आणि पेरूमध्ये या नव्या नियमाची चाचणी सुरू केली. परंतु आता पुढील एका वर्षात हा नियम जागतिक स्तरावर आणण्याची कंपनीची योजना आहे. हा नवीन नियम म्हणजे, जे वापरकर्ते कुटुंबाबाहेरील लोकांसह खाती शेअर करतील त्यांच्यासाठी कंपनी अधिक शुल्क आकारेल. नेटफ्लिक्सने म्हटले आहे की या बदलाची चाचणी घेण्यासाठी जवळपास एक वर्ष लागेल आणि मग हे सुनिश्चित केले जाऊ शकते की जे वापरकर्ते आपले खाते त्यांच्या कुटुंबाबाहेरील लोकांसह शेअर करतात त्यांच्याकडून किती शुल्क आकारले जाईल. कंपनीचे मुख्य उत्पादन अधिकारी ग्रेग पीटर्स यांनी सांगितले की, कंपनी दोन वर्षे या दिशेने काम करत आहे. त्याची नुकतीच चाचणी करण्यात आली आणि योग्य शुल्क शोधण्यासाठी थोडा वेळ लागेल. नेटफ्लिक्स काही ठिकाणी वापरकर्त्यांना मानक आणि प्रीमियम सबस्क्रिप्शनसह उपखाती (सबअकाउंट) जोडण्याची परवानगी देखील देत आहे. हे उपखाते अशा लोकांसाठी आहे जे ग्राहकांसोबत राहत नाहीत. प्रत्येक उपखात्याचे स्वतःचे प्रोफाइल आणि रेकमेंडेशन इत्यादी असेल. ते जीपीएस आधारित नसेल. तो आयपी ॲड्रेस, डिव्हाइस आयडी इत्यादी वापरेल आणि यावरून हे कळेल की यूजर्स त्यांचे अकाउंट घराबाहेरील लोकांसोबत शेअर करत आहेत की नाही.

# महान गणिततज्ञ श्रीनिवास रामानुजन

## निमित्त

शालेय जीवनात बरेच जणांना कठीण वाटणारा विषय म्हणजे गणित, गणिताची चाचणी म्हटलं की, तेव्हा प्रत्येकाच्या अंगावर शहारे यायचे, पण तेच शालेय जीवनात कधी पदवीच्या मुलांना शिकवले का? नाही ना! पण आपल्याच देशाच्या एका महान व्यक्तिमत्वाने शाळेत असताना पदवीच्या मुलांना गणित शिकवले, ते व्यक्तिमत्व म्हणजे श्रीनिवास रामानुजन. आजच्या या लेखात याच महान व्यक्तिमत्वाविषयी माहिती-

श्रीनिवास रामानुजन यांचा जन्म २२ डिसेंबर १८८७ रोजी एका ब्राम्हण परिवारात झाला. त्यांचा परिवार भारताच्या तामिळनाडूच्या कोइम्बतुर मधील इरोड गावात झाला. त्यांचे वडील श्रीनिवास अय्यंगर हे साड्यांच्या दुकानात मुनीम म्हणून काम पाहत असत. सुरुवातीला रामानुजन कुंभकोणम या गावी आपल्या परीवारासोबत राहायचे. त्यांचे प्राथमिक शिक्षण हे कुंभकोणम या गावामध्येच झाले आणि त्यांना सुरुवातीपासून गणिताची आवड असल्याने बाकी इतर विषयांमध्ये रुची निर्माण झालीच नाही, ते शाळेत असताना त्यांच्या घरी काही पदवीचे मुले भाडेकरू म्हणून राहत असत. आणि रामानुजन गणितात एवढे तरबेज होते की ते सातवीत असतानाच पदवीच्या त्या मुलांना गणित शिकवत असत. सुरुवातीला त्यांना त्यांच्या अलौकिक प्रतिभेमुळे शिष्यवृत्ती मिळाली. रामानुजन गणितामध्ये एवढे मग्न झाले होते की त्यांनी इतर विषयांकडे लक्ष दिले नाही. रामानुजन यामुळे १२ वी मध्ये नापास झाले. आणि त्यांना मिळणारी शिष्यवृत्ती सुद्धा बंद झाली. त्यानंतर त्यांच्या शिक्षणाचे दरवाजे बंद झाले. आता ते बेरोजगार झाले होते कारण त्यांच्याकडे आता कोणतेही काम नव्हते आणि हा काळ त्यांच्यासाठी खूप कठीण काळ होता. या कठीण काळात त्यांच्याकडे त्यांच्या गणिता शिवाय कोणतीही गोष्ट नव्हती, त्यांना या कठीण काळात खूप काही सहन करावे लागले. जसे लोकांजवळ त्यांना पैशांची भिकसुद्धा मागावी लागली, रस्त्यावरचे कागद सुद्धा उचलून आपला उदरनिर्वाह करावा लागला. त्यांनतर त्यांची तब्येत सुद्धा घसरली. याच दरम्यान १९०८ मध्ये त्यांच्या आईने त्यांचे लग्न जानकी नावाच्या एका मुलीशी लावले त्यानंतर त्यांच्यावर आणखी एक जबाबदारी येऊन पडली होती. आता त्यांना काम शोधणे अनिवार्य झाले होते, तेव्हा त्यांनी मद्रासमध्ये जाऊन पुन्हा नोकरी मिळण्यासाठी प्रयत्न केल. ते कोणाकडे सुद्धा जायचे तेव्हा त्यांनी सोडविलेले गणिते ते लोकांना दाखवत असत, पण कोणीही त्या गणितांना न समजता त्यांना नकारात असे, पण खूप दिवसांच्या मेहनतीनंतर एक दिवस त्यांची भेट तेथील डेप्युटी कलेक्टर व्ही.रामास्वामी अय्यर यांच्याशी झाली, ते गणितामध्ये पारंगत होते. जेव्हा त्यांनी रामानुजन यांनी सोडविलेली गणिते पाहिली तेव्हा त्यांनी ओळखले की ही व्यक्ती एक प्रतिभावान व्यक्ती आहे आणि त्यांनी रामानुजन यांना कामावर ठेवून घेतले. २५ रुपये महिन्याच्या पगाराने येथून रामानुजन यांचे संपूर्ण आयुष्याला एक वेगळं



वळण मिळाले. त्यानंतर त्यांनी या मासिक वेतनामधून पुन्हा आपल्या शिक्षणाची वाटचाल सुरु केली. १ वर्ष मद्रासमध्ये राहून त्यांनी स्वतः चे एक शोधपत्र प्रकाशित केले. त्या प्रकाशित केलेल्या शोधपत्रकाचे नाव होते, जर्नल ऑफ इंडियन मॅथेमेटिकल सोसाइटी. या शोधपत्रकामुळे त्यांना प्रसिद्धी मिळाली आणि १९१२मध्ये त्यांना रामचंद्र राव यांच्या ओळखीमुळे त्यांना मद्रास पोर्ट ट्रस्टमध्ये एक क्लर्कची नोकरी मिळाली. तेच काही दिवसांनतर सुत्र प्राध्यापक सेशू अय्यर यांनी रामानुजन यांना केंब्रिज येथील प्रसिद्ध गणिताचे प्राध्यापक जीएच हार्डी यांना पत्र पाठविण्याचे सुचविले. त्यानंतर रामानुजन यांनी त्यांचे सर्व प्रमेय एका पत्रात लिहून त्यांना पाठविली, आणि जीएच हार्डी यांना ते एवढे आवडले की त्यांनी रामानुजन यांना लगेच त्यांच्याकडे बोलावून घेतले. तेथे गेल्यावर जीएच हार्डी यांनी त्यांच्या शिक्षणाचा खर्च उचलला. १९१६मध्ये रामानुजन यांनी बीएस्सीची पदवी पूर्ण केली. इंग्लंडला जीएच हार्डी आणि रामानुजन हे सर्वांच्या चर्चेचा विषय बनले आणि जीएच हार्डी यांनी रामानुजन यांच्या जवळून खूप काही नवीन शिकायला मिळाले असे वक्तव्यसुद्धा केले होते.

रामानुजन शेवटच्या दिवसांमध्ये अंथरुणावरच पडलेले होते. २६ एप्रिल १९२० रोजी रामानुजन यांचे निधन झाले.

('मायमराठी'तून साभार)

## क्लिक...क्लिक...!



**मुरुड : मुरुड काशिद किनाऱ्यावरची ही टेकडी पर्यटकांना भावते. भरतीवेळी तर टेकडीवर लाटा आपटून रम्य देखावा तयार होतो. पर्यटक नेहमीच काशिद किनाऱ्याला पसंती देतात. रायगडात काशिद किनारा प्रसिध्द आहे.** (छाया : सुधिर नाझरे)

## आरोग्य प्रहर

### पोटाची चरबी होणार कमी, जाणून घ्या या टिप्स...

कोरोना काळात वर्क फ्रॉम होम असो की घरीच तासान्तास आराम आणि बसत राहल्याने याचा दुष्परिणाम लोकांच्या आरोग्यावर दिसून आला. यात मुख्यत: लोकांचे वजन वाढले आहे. यात पोटाच्या चरबी वाढल्याचे प्रमाण अधिक आहे. पोटाची चरबी घालवण्यासाठी आपण डायटींग करतो. पण अनेकदा त्याचाही काहीही फायदा होत नाही मग चरबी कमी करण्यासाठी नेमकं काय करता येईल? काळजी करण्याचे कारण नाही. या खालील टिप्स पाळा आणि एका महिन्यात तुमची चरबी कमी होईल.



भरपूर जेवण्याची सवय असेल तर ही सवय सोडावी लागेल. आपला आहार ३ ते ४ भागांमध्ये वाटून घ्या. प्रत्येकावेळी पोटभर न जेवता थोड्या प्रमाणात खा. यामुळे तुमची पोटाची चरबी कमी होईल. गरम पाणी-पहाटे रिकाम्या पोटी गरम पाणी पिल्यास चरबी कमी होते कारण गरम पाणी पिल्याने कॅलरीज कमी होतात. याव्यतिरिक्त जर आपण गरम पाण्यात लिंबू आणि मधाचा समावेश केला तर तुम्हाला याचा अधिक फायदा होईल.

व्यायाम करणे-व्यायाम करणे हा पोटातील चरबी कमी करण्यासाठी उत्तम उपाय आहे याने हळुवार फॅट्स कमी होतात आणि पचनतंत्र सुद्धा सुरळीत होते. रात्री उशिरा जेवू नये-रात्री उशिरा जेवणे हे पोटातील चरबी वाढण्याचे प्रमुख कारण आहे. रात्री झोपण्याच्या २ तासाआधी जेवून घ्यावे किंवा रात्री काही हलका आहार घ्या. याव्यतिरिक्त जेवल्यानंतर शतपावली करावी. दरम्यान आजच्या जीवनशैलीमुळे लोकांमध्ये लठ्ठपणा वाढला आहे. यामुळेच प्रत्येक तिसर्या व्यक्तीचे पोट वाढलेलं तुम्हाला पाहायला मिळेल. यामुळे ती व्यक्ती केवळ वयापेक्षा मोठी दिसत नाही, तर त्याच्या पोटावर साठलेली पोटाची चरबी त्याच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वात बदल घडवून आणते. इतकंच नाही तर आज प्रत्येकाला वाटते की, तो फिट असावा आणि तो त्याच्या वयापेक्षा कमी दिसावा. पण अनेकदा लोक अशा चुका करतात, ज्याची त्यांना जाणीवही नसते आणि पोटाची चरबी वाढतच जाते. तसे, बऱ्याच लोकांमध्ये पोटावर चरबी जमा होण्याचे कारण आनुवंशिकता देखील आहे. त्याचबरोबर अनेकांची तब्येत बिघडल्याने त्यांच्यात लठ्ठपणाच्या तक्रारी वाढतात. जर तुम्हालाही पोटाच्या चरबीचा त्रास होत असेल तर तुम्ही करत असलेल्या चुका सुधाराव्या लागतील. यामुळे तुमच्या पोटावर जमा झालेली चरबी काही दिवसात वितळण्यास सुरुवात होईल आणि तुम्ही पूर्णपणे स्लिम व्हाल.

# रोहा ब्राह्मण मंडळातर्फे मिटकरींच्या वक्तव्याचा निषेध


(छाया : जितेंद्र जाधव)

**धाटाव : प्रतिनिधी**

आमदार अमोल मिटकरी यांनी ब्राह्मण समाजाच्या भावना दुखावणारे व हिंदु वैदिक विधींची टिंगलटवाळी करणारे वक्तव्य केले, या वक्तव्याचा व या वक्तव्याला खतपाणी घालण्याचे काम करणाऱ्या दोन मंत्र्यांच्या कृतीचा सोमवारी (दि. २५) ब्राह्मण मंडळ रोहा तर्फे निषेध व्यक्त करण्यात आला. तसेच आमदार मिटकरी यांच्यावर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी करणारे निवेदन रोहा तहसीलदार व पोलीस ठाण्यात देण्यात आले.

जिल्हा ब्राह्मण संस्थेचे सचिव सतिश गोडसे, रोहा ब्राह्मण मंडळाचे अध्यक्ष अमित आठवले, उपाध्यक्ष आनंद काळे, सचिव निखिल दाते, खजिनदार चैतन्य आठवले, कमिटी सदस्य प्रकाश कुंटे, उदय गोखले, श्रीनिवास रिसबुड, विदुला परांजपे, नेहा आवळसकर, समाजातील ज्येष्ठ सदस्य गिरीश पेंडसे, मोहन साठे, पुरुषोत्तम कुंटे, उदय टिल्लू,संतोष दाते, महेश पेंडसे, वैभव भट, दीपक पराडकर, युवा कार्यकर्ते प्रतिक पाटणकर, किरण कानडे, स्वप्नील जोशी आदींसह समाजबांधव या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# पुढील पिढीला इतिहासच मार्गदर्शक ठरू शकेल -पुंडलिक पाटील

## कर्जतमध्ये 'भूली हुई यादे' पुस्तकाचे प्रकाशन


(छाया : विजय मांडे)

**कर्जत : प्रतिनिधी**

सध्या संगणकीय युगात सारे काही सोपे झाले आहे. मात्र मागच्या पिढीतील माणसांनी कसा संघर्ष केला, त्यांना किती मेहनत करावी लागली, किती खस्ता खाव्या लागल्या हे आपण लिहिलेल्या अनुभवावरून कळेल. त्यामुळे आपण लिहीत राहिले पाहिजे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती पुंडलिक पाटील यांनी येथे केले.

सामाजिक कार्यकर्ते विजय हरिश्चंद्रे यांच्या विषयी त्यांच्या मित्रांनी व प्रतिष्ठित नागरिकांनी लिहिलेले अनुभव सुभाषचंद्र नातू यांनी संकलित करून 'भूली हुई यादे' पुस्तक तयार केले. या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ रॉयल गार्डन सभागृहात आयोजित करण्यात आला होता. त्यात पुंडलिक पाटील बोलत होते. इतिहासच पुढच्या पिढ्यांना मार्गदर्शक ठरू शकेल, असे मत त्यांनी या वेळी व्यक्त केले. रेल्वे प्रवासी संघटनेचे विजय हरिश्चंद्रे २० वर्षे सचिव होते. यावरून त्यांच्या कामाचा आवाका आपल्या लक्षात येईल, असे पुंडलिक पाटील म्हणाले.

नगराध्यक्षा सुवर्णा जोशी यांच्या हस्ते समारंभाचे उद्घाटन करण्यात आले. माजी नगरसेवक निलेश हरिश्चंद्रे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सुभाषचंद्र नातू यांनी प्रास्ताविकात समारंभाचा उद्देश सांगितला. नगराध्यक्ष जोशी यांनी 'हरिश्चंद्रे आणि अनंतकाका जोशी यांची मैत्री कशी होती? ते सांगून हरिश्चंद्रे यांची कामाची पद्धत व पाठपुराव्याचा पिच्छा सांगितला. माजी नगराध्यक्ष राजेश लाड, भाजप जिल्हा उपाध्यक्ष दीपक बेहरे, प्रभाकर करंजकर आदींनी आपली मनोगते व्यक्त केली. हरिश्चंद्रे यांना मनोगत व्यक्त करताना भावना अनावर झाल्या. जागतिक दर्जाचे चित्रकार पराग बोरसे, ज्येष्ठ पत्रकार विजय मांडे, ज्योती जाधव, मुद्रक मंदार दगडे, सुभाषचंद्र नातू आदींचा या वेळी विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विकास चित्ते यांनी केले.सुधाकर आंबवणे, प्रसाद पाटील, शिरीष ताम्हाणे, रमेश भागवत, श्याम शिंदाडकर, शिवसेवक गुप्ता यांच्यासह हरिश्चंद्रे कुटुंबीय व नागरिक या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हरवलेली दागिन्यांची बॅग केली मालकास परत

## ■ वाहतूक पोलीस रमेश गायकवाड यांचे विशेष कौतुक

**पेण : प्रतिनिधी**

खेड ते ठाणे असा प्रवास करणाऱ्या दुचाकीस्वाराची सोन्याच्या दागिन्यांची बॅग रविवारी (दि. २४) पेण वाहतूक पोलिसांना मिळून आली. पेण पोलीस ठाण्यात दागिन्यांची व संबंधितांची खातरजमा करून ती बॅग मुळ मालकाच्या ताब्यात देण्यात आली. त्यामुळे पेण पोलिसांचे तसेच वाहतूक पोलीस रमेश गायकवाड यांचे विशेष कौतुक करण्यात येत आहे.

प्रभू रामचंद्र शिंदे (वय ४०, रा. ठाणे, मूळ रा. खेड, जि. रत्नागिरी) हे पत्नी छायासह रविवारी दुचाकी (एम्एच-०४,जेइ-२७९४) वरून खेड येथून ठाण्याला जात होते. त्यांच्या दुचाकीला बांधलेल्या दोन बॅगांपैकी सोन्याचे दागिने असलेली बॅग प्रवासादरम्यान हरवली असल्याचे साई-पनवेल येथे आल्यावर त्यांच्या लक्षात आले. याच मार्गावर बॅग शोधत असताना बॅग वाहतूक पोलीस रमेश गायकवड यांना मिळाली असल्याचे समजले.

वाहतूक पोलीस रमेश गायकवड यांना सापडलेल्या बॅगेतील मंगळसूत्र, सोन्याचे कानातले दोन जोड, सोन्याचा एक हार, सोन्याची अंगठी, सोन्याची माळ, सोन्याच्या कानातील बुगडी जोड़ एक, चांदिचा छल्ला असे दागिने प्रभू शिंदे यांचेच असल्याची खातरजमा पेण पोलीस ठाण्यात करून ही बॅग त्यांच्या ताब्यात देण्यात आली.


(छाया : अनिस मनियार)

# भाजपतर्फे मुरूडमध्ये मोफत आधार कार्ड शिबिर

**मुरूड : प्रतिनिधी**

तालुका भाजपतर्फे मुरूडमध्ये २७,२८,२९ एप्रिल रोजी मोफत नवीन आधार कार्ड व दुरुस्तीसाठी विशेष शिबिर आयोजित करण्यात आले असून, त्याचा नागरिकांनी फायदा घ्यावा, असे आवाहन भाजपचे ज्येष्ठ नेते जनार्दन (आण्णा) कंधारे यांनी केले आहे.

मुरूड तालुक्यात नेमकेच आधार कार्ड सेंटर असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. हे लक्षात घेऊन तालुका भाजपतर्फे शेगवाडा येथील पक्ष कार्यालयाजवळ तीन दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात नवीन आधार कार्ड काढणे, पत्ता बदलणे, नावात दुरुस्ती अथवा बदल करणे, फोटो अपडेट करणे, जन्मतारीख दुरुस्त करणे, फोन नंबर बदलणे, आधार कार्ड मोबाइलला लिंक करणे आदी होईल.


## जाहीर प्रसिद्धीकरण

पुढे नमुद केलेल्या सहकारी संस्थांचा सन २०२२ ते २०२७ या कालावधीतील पंचवार्षिक निवडणूकीसाठी निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यांत येत आहे. संस्थांची नावे- १.पनवेल जनता नागरी सहकारी पतसंस्था मर्या, पनवेल २.केशवस्मृती नागरी सहकारी पतसंस्था मर्या, पनवेल ३.तुळजाभवानी नागरी सहकारी पतसंस्था मयो, पनवेल सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि.२७/०४/२०२२ ते दि.०४/०५/२०२२, नामनिर्देशन पत्र छाननी दि.०५/०५/२०२२, नामनिर्देशन माघारी दि.०६/०५/२०२२ ते दि.२०/०५/२०२२ व आवश्यकतेनुसार मतदान दि.२९/०५/२०२२ रोजी घेण्यात येईल. तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणुकीबाबत सुचना व अधिक माहिती संस्थेचे कार्यालयात व तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, पनवेल, सुशिला निवास, मिडलक्लास हौसिंग सोसा. पनवेल यांचे कार्यालयात पहावयास मिळेल. तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

| सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|
| (बालाजी वाघमारे) | (सुरेखा पाटील) | (दत्तात्रय धायगुडे) |
| निवडणूक निर्णय अधिकारी, | निवडणूक निर्णय अधिकारी, | निवडणूक निर्णय अधिकारी, |


# मुरूडमध्ये विहिरीत आढळला महिलेचा मृतदेह



**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यातील नांदगाव भागातील शबनम साठे (वय ३१) या मागील तीन महिन्यांपासून बेपत्ता होत्या. त्यांचा मृतदेह रविवारी (दि. २४) नांदगावमधील एका विहिरीत आढळल्याने खळबळ उडाली आहे.

शबनम साठे या मागील तीन महिन्यांपासून बेपत्ता होत्या. त्याबाबत मुरूड पोलीस ठाण्यात हरवल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती. मुरूड पोलीस या महिलेचा कसून शोध घेत होते. रविवारी नूतन स्कूल ऑफ नर्सिंगचे शिक्षक सागर माळी यांनी पोलिसांना फोन करून नांदगाव येथील विहिरीत महिलेचा मृतदेह तरंगत असल्याची माहिती दिली. मुरूड पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. मृत महिलेचा बुरखा, चपला विहिरीजवळ आढळून आल्या. महिलेचे पती मकबूल अकबर साठे यांनी हिजाब, कपडे, व चपला पाहून तीच शबनम असल्याचे सांगितले. मुरूड पोलीस अधिक तपास करीत आहेत.


## PANVEL MUNICIPAL CORPORATION

No. PMC/CE/PMAY/14/2022

CITY ENGINEER'S OFFICE (PMAY DEPARTMENT)

**INVITATION OF TENDER FOR THE WORKS OF "CONSTRUCTION OF HOUSING COMPLEX UNDER PRADHANMANTRI AAWAS YOJANA" (PMAY)**

Offers by way of e-tendering (Lump Sum Turn-key Form) are invited by the Commissioner, Panvel Municipal Corporation from contractors in e-tendering system for following works. Contractor shall quote his offer considering all taxes excluding GST.

| Name of work | Estimated cost put to the Tender (Rs) | Amount of E.M.D (Rs) | Time limit in Calendar months | Cost of Tender Document (Rs.) |
|---|---|---|---|---|
| Survey, planning, designing, building construction, obtaining all relevant permissions, required completion/ occupancy certificate from concerned authority on EPC (Lump-sum) for Construction of affordable housing under Pradhan Mantri Awas Yojana (Urban) for Rehab and Free sale dwelling units EWS - 618 & LIG - 150 with commercial component of 118 shops on 5 different locations within Panvel Municipal Corporation area. | 120.36 Crores | 60.18 Lakhs | 36 Months (Including Monsoon) | Rs.5,000/- + 18% GST<br>Total Rs.5900/ |

The details of above works, such as Security Deposit, Earnest Money Deposit, Terms & Conditions of the Tender and Schedule of works, are available on website www.mahatenders.gov.in Tenders for these works are to be submitted by e-tendering system. Bidders can avail the e-tender document 13/06/2022 up to 5.00 PM.

Bidders should submit their offer by way of e-tendering system only. The last date of Submission by way of e-tendering will be 13/06/2022 up to 5.00 PM. Commissioner, Panvel Municipal Corporation reserves the right to accept or reject any or all tender without giving any reason thereof.

**Sd/-**
Additional Commissioner, (I)
Panvel Municipal Corporation,
Panvel – 410 206



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## Tender Extension Notice

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors/agencies on Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following work

| Tender No.: EE/400kV/RS(O&M)/DN/KHR/Ten-5/22-23 (RFX No. 7000023007) | Period for submission of E-Bid: 25.04.2022 to 02.05.2022 up to 14:00 hrs. |
|---|---|

**Name of Work : AMC of various maintenance activities to be carried out under planned and emergency outages at 400kV RS, Kharghar**

| Estimated Cost | EMD (Rs.) | Tender Fee (Rs.) | Closing Date | Technical opening date | Commercial opening date |
|---|---|---|---|---|---|
| Limited to Rs.25,00,000/- (Including GST) | Rs. 25,000/- | Rs.500/- + GST | 02.05.2022 up to 14:00 hrs | 02.05.2022 at 14:01 hrs. (If possible) | 02.05.2022 at 15:00 hrs. (If possible) |

**Contact Persons :**
1) Mr. S. O. Katkar, Executive Engineer, 400kV RS O&M Dn., Kharghar, 7666127972
2) Ms. P. C. Deshpande, Dy.EE (O), 400kV RS O&M Dn., Kharghar, 9819313988
For further details visit our website www.**mahatransco.in**
1] Tender documents can be downloaded by only online from aforesaid website.
2] Eligible contractor should submit their bid well in advance instead of waiting till last date. MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.
**Note :-** All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tender portal (New) - **https://srmetender.mahatransco.in.**

**SD/-**
**Executive Engineer,**
**400kV R.S. (O&M) Dn., Kharghar**



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## Tender Extension Notice

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors/agencies on Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following work

| Tender No.: EE/400kV/RS(O&M)/DN/KHR/Ten-4/22-23 (RFX No. 7000022975) | Period for submission of E-Bid: 25.04.2022 to 02.05.2022 up to 14:00 hrs. |
|---|---|

**Name of Work : AMC of restoration and maintenance of the SECURITRON make Fire Detection and Alarm system provided at 400kV R.S., Kharghar**

| Estimated Cost | EMD (Rs.) | Tender Fee (Rs.) | Closing Date | Technical opening date | Commercial opening date |
|---|---|---|---|---|---|
| Limited to Rs.10,00,000/- (Including GST) | Rs. 10,000/- | Rs.500/- + GST | 02.05.2022 up to 14:00 hrs | 02.05.2022 at 14:01 hrs. (If possible) | 02.05.2022 at 15:00 hrs. (If possible) |

**Contact Persons :**
1) Mr. S. O. Katkar, Executive Engineer, 400kV RS O&M Dn., Kharghar, 7666127972
2) Ms. P. C. Deshpande, Dy.EE (O), 400kV RS O&M Dn., Kharghar, 9819313988
For further details visit our website www.**mahatransco.in**
1] Tender documents can be downloaded by only online from aforesaid website.
2] Eligible contractor should submit their bid well in advance instead of waiting till last date. MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.
**Note :-** All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tender portal (New) - **https://srmetender.mahatransco.in.**

**SD/-**
**Executive Engineer,**
**400kV R.S. (O&M) Dn., Kharghar**



## जाहीर निविदा सूचना

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, कृषिपर्यवेक्षक तालुका फळ रोपवाटिका देहेण, तालुका-म्हसळा, जिल्हा-रायगड येथील प्रक्षेत्रावरी कलमे/रोपे उत्पादन, मातृवृक्ष संगोपन, गांडूळखत, गांडूळकल्चर उत्पादन व इतर किरकोळ कामे कंत्राटी पद्धतीने करणेच्यासाठी मागील चार वर्षातील प्रती वर्षी सरासरी ३९०० मनुष्यदिन आहे. तसेच कलमे उत्पादनकरिता सामुग्री पुरवठ्यासाठी दिनांक ०१/०४/२०२२ ते ३१/०३/२०२३ पर्यंतच्या कालावधीकरिता मजुरांची आवश्यकता असून कृषिपर्यवेक्षक तालुका फळ रोपवाटिका देहेण ता. म्हसळा, जि. रायगड यांच्याकडून निविदा मागवण्यात येत आहेत. सध्या प्रक्षेत्रात उपलब्ध असलेली विक्री योग्य कलमे/ रोपे, मातृवृक्ष, संगोपन, गांडूळखत/कल्चर उत्पादन, नदीवरील पंप चालू बंद करणे इतर किरकोळ कामे यांच्यावर दिनांक ०१/०४/२०२२ ते ३०/०४/२०२२ पर्यंत होणारा खर्च MREGS किंवा नवीन निविदामध्ये जो कमी असेल तो गृहीत धरण्यात येईल. दिनांक ०१/०५/२०२२ ते ३१/०३/२०२३ पर्यत कलमे/रोपे उत्पादन, मातृवृक्ष संगोपन, इतर बाबींसाठी लागणारी साधनसामुग्री यामध्ये औजारे, औषधे प्लास्टिक पिशव्या, कलमे बांधणेसाठी लागणारी पटी, सुतळ, दोरी, उत्पादनसाठी लागणारे इतर साहीत्ये कृषिपर्यवेक्षक तालुका फळ रोपवाटिका देणे ता. म्हराळा, जि. रायगड यांचे मार्फत पुरवण्यात येईल, तरी इछुक संस्था अथवा व्यक्ति यांनी कृषिपर्यवेक्षक तालुका फळ रोपवाटिका देहेण येथील प्रक्षेत्रावर उपलब्ध साधन सामुग्री व सुविधा यांची पाहणी करून आपल्या निविदा बंद पाकीटात दिनांक २९/०४/२०२२ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत तालुका फळ रोपवाटिका देहेण यांच्या कार्यालयात पोहचतील या बेताने पाठवणारा कृषिपर्यवेक्षक तालुका फळरोपवाटिका दहेण ता म्हसळा यांनी आवाहन केले आहे. कोरे निविदा फॉर्म व कंत्राटीकामाच्या अटी व शर्ती दिनांक २६/०४/२०२२ ते २८/०४/२०२२ दुपारी १.०० वाजे पर्यंत कृषिपर्यवेक्षक तालुका फळ रोपवाटिका देहेण ता. म्हसळा, जि. रायगड यांचे कार्यालयत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत रक्कम रु. ५००/- रोख भरून देण्यात येईल. दिनांक २८/०४/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजेनंतर पोस्टाने उशीरा प्राप्त होणाऱ्या अथवा उशिरा आलेल्या निविदाचा कोणत्याही प्रकारचा विचार करण्यात येणार नाही, तसेच कृषिपदवीधर, कृषिपदवीकाधारक अथवा कलमेरोपे बांधण्याचा ३ वर्षाचा अनुभव असलेल्या व्यक्तीस प्रथम प्राधान्य देण्यात येईल. विहित कालावधीत प्राप्त झालेल्या निविदा दि. २८/०४/२०२२ रोजी दुपारी ठीक ३.०० वाजता मा.उपविभागीय कृषिअधिकारी महाड जि. रायगड यांचे कार्यालयात त्यांच्या समक्ष उघडण्यात येतील. निविदा उघडण्याच्या वेळी निविदाधारक उपस्थितीत राहण्यास हरकत नाही. कोणतेही कारण नदेता निविदा मंजूर करणे अथवा मंजूर नाकरणे याबाबतचे सर्व अधिकारी माननीय उप विभागीय कृषिअधिकारी महाड जि-रायगड यांनी राखून ठेवले आहेत.

ठिकाण :- देहेण.
दिनांक :- २५/०४/२०२२.

**सही/-**
**कृषिपर्यवेक्षक**
तालुका फळ रोपवाटिका देहेण
ता. म्हसळा, जि. रायगड.

# उन्हाच्या काहिलीने होतेय अंगाची लाही लाही

## नागरिक हैराण; आरोग्याच्या तक्रारी वाढल्या

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गेल्या आठवड्याभरापासून वातावरण अचानक वाढलेल्या उष्णतेमुळे नागरिक हैराण झाले आहेत. हवामान खात्याने दिलेल्या इशाऱ्यानुसार राज्यात अनेक ठिकाणी मुसळधार पाऊस पडत असून काही ठिकाणी उष्णतेची लाट आली आहे.

पनवेल परिसरात गेल्या तीन दिवसांपासून उष्णतेमध्ये प्रचंड वाढ झाल्याने नागरिकांच्या आरोग्याच्या तक्रारीही वाढल्या आहेत.

पनवेल तालुक्यात गेल्या तीन दिवसांत मोठ्या प्रमाणात उष्णता वाढल्याचे पाहायला मिळत आहे. उन्हाच्या वाढत्या तडाख्याने सकाळी ८ वाजल्यापासून घामाच्या धारा वाहू लागल्या आहेत. सकाळी ११ वाजल्यानंतर अनेक जण घराबाहेर पडणे टाळत आहेत. उष्णतेमध्ये अचानक वाढ झाल्याने नागरिकांना पित्त, घेरी येणे, ताप येणे, अपचन होणे अशा प्रकारच्या व्याधी जडत असल्याने रुग्णालयांमध्ये गर्दी वाढली आहे. वाढत्या उष्णतेचा सर्वात जास्त त्रास हा ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांना होत आहे. कामानिमित्त उन्हाच्या तडाख्यात बाहेर पडणाऱ्या कामगार वर्गामध्ये पित्त, घेरी येणे, त्वचेचे विकार यामध्ये वाढ झाल्याचे सांगण्यात येत आहे.

बेसुमार वृक्षतोड, हवेचे प्रदूषण यामुळे तापमानात सातत्याने असे विचित्र बदल होत असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. रायगड जिल्ह्यातील महाड, पोलादपूर परिसरात शनिवारी व रविवारी मुसळधार पाऊस झाला. पनवेल तालुक्यातीलही काही भागात तुरळक सरी कोसळल्या, मात्र यामुळे गेल्या उष्णतेमध्ये वाढ झाल्याचे सांगण्यात येत आहे.

### *एसी, कुलरला मागणी वाढली*

*वाढत्या उष्णतेमुळे नागरिक हैराण झाले असले तरीदेखील कुलर, एसीच्या मागणीत वाढ झाल्याने व्यापारी वर्गात मात्र काहीसे आनंदाचे वातावरण आहे. उन्हाच्या काहिलीपासून वाचण्यासाठी अनेक जण विविध प्रकारचे ज्यूस, कुल्फी, आईस्क्रिमचा आधार घेत आहेत. वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने फ्रिजपेक्षा मातीच्या मडक्यांनाही मागणी वाढली आहे.*

# रेल्वे रूळ ओलांडणे ठरतेय जीवघेणे

## पोलिसांनी कारवाई करण्याची गरज

**पनवेल : वार्ताहर**

रेल्वेस्थानकात अनेक वेळा रूळ ओलांडू नका, रेल्वेरूळ ओलांडणे धोकादायक आहे, असा स्पीकरवरून संदेश दिला जात असतो. याकरिता प्रवाशांना ठराविक ठिकाणी सूचनादेखील दिल्या जात असून, नवी मुंबईमधील सर्वांत मोठे रेल्वे स्थानक असलेल्या पनवेल रेल्वेस्थानकात या नियमांचे सर्रास उल्लंघन सुरू आहे.

शेकडो प्रवासी रेल्वेरूळ ओलांडून स्वतःचा जीव धोक्यात घालत असतात. स्थानकात सर्वत्र सीसीटीव्हीचे जाळे पसरलेले असूनदेखील या प्रवाशांबाबत रेल्वे पोलीस केवळ बघ्याची भूमिका घेताना दिसून येत आहे.



अनेकांना कार्यालय गाठण्याची किंवा घरी जाण्याची घाई असते. अशावेळी अनेक जण पुलांचा सुरक्षित पर्याय सोडून चटकन रेल्वेस्थानक गाठण्यासाठी रूळ ओलांडण्याचा धोका पत्करतात त्यातून अपघात घडतात. शनिवारी मोठ्या प्रमाणात रेल्वेरूळ ओलांडताना पहावयास मिळाले. त्यामध्ये रेल्वे ओलांडताना अनेक प्रवाशांचा मृत्यूही झाला आहे. याकडे रेल्वे पोलिसांनी गांभिर्याने लक्ष देऊन धोकादायकरित्या रेल्वेरूळ ओलांडणाऱ्यांवर कारवाई करण्याची गरज असल्याचे बोलले जात आहे.

# पनवेलमधील शासकीय अध्यापक महाविद्यालयात पदवीदान समारंभ

**पनवेल : वार्ताहर**

शासकीय अध्यापक महाविद्यालय येथे पदवीदान समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून सेकंडरी ट्रेनिंग कॉलेज, मुंबई येथील प्राचार्या डॉ. मसरत अली उपस्थित होत्या. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत लेझीम नृत्य, तारपा नृत्याने झाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक या महाविद्यालयाच्या सहयोगी प्राध्यापक डॉ. निलीमा अरविंद मोरे यांनी केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुविद्या महेश सरवणकरांनी विद्यार्थ्यांना शिक्षण म्हणजे काय? हे समजावून सांगितले. त्यांनी अब्राहम लिंकन यांनी मुख्याध्यापकास लिहिलेले पत्र वाचून दाखविले. शेवटी पदवीसाठी उपस्थित विद्यार्थी व प्राध्यापकांकडून शपथ घेतली गेली. प्रमुख पाहुण्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांचा आदर्श सर्व विद्यार्थ्यांनी ठेवावा असे आवाहन केले, तसेच शिक्षण घेण्याची खरोखरच मनापासून जर इच्छा असेल तर कोणतेही संकट हे मोठे नसते. त्यातून मार्ग हा १०० टक्के निघतो. फक्त त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा आवश्यक आहे, असे सांगितले.

या वेळी शैक्षणिक वर्ष २०१९-२१च्या बी.एड आणि एम.एडच्या छात्राध्यापकांनी पदवी घेण्यासाठी उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋतुजा हेलवाडे यांनी केले तर आभारप्रदर्शन प्रा. बिजली दडपे यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमाची जबाबदारी डॉ. निलीमा अरविंद मोरे यांनी स्विकारली.



# लहान भावाचा मोठ्या भावावर चाकू हल्ला

**पनवेल : वार्ताहर**

लहान भावाने मोठ्या भावाच्या पोटामध्ये चाकू भोसकून त्याला जखमी केल्याची घटना उलवे येथे घडली. नरेंद्र मलिक यांच्याविरोधात न्हावाशेवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उलवे, सेक्टर ९ येथील बिजेंद्र मलिक हे त्यांच्या कुटुंबासह राहतात. त्यांचा लहान भाऊ नरेंद्र हा त्याच्या रूममध्ये टीव्हीचा आवाज मोठ्याने करून टीव्ही पाहत बसला होता. या वेळी त्याला टीव्हीचा आवाज कमी कर, सोसायटीमधील लोकांना याचा त्रास होत आहे असे बोलल्यावर नरेंद्र याने बिजेंद्र यांना शिवीगाळ केली. त्यानंतर आता रात्र खूप झालेली आहे तू झोप, आम्हाला पण झोपू दे असे म्हणाला. नरेंद्र याने तुला बघून घेतो असे बोलून चाकू घेतला व बीजेंद्र यांच्या पोटामध्ये भोसकले. यात बिजेंद्र मलिक हे गंभीर जखमी झाले आहेत.

# सहकार भारतीतर्फे गृहनिर्माण संस्था प्रशिक्षण कार्यक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

सहकार भारती नवी मुंबई महानगरतर्फे रविवारी (दि. २४) निर्माण संस्था प्रशिक्षण कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून बेलापूर विधानसभा मतदार संघाच्या आमदार मंदा म्हात्रे उपस्थित होत्या तसेच महाराष्ट्र -गोवा प्रदेश संघटन प्रमुख लक्ष्मण पात्रा, महाराष्ट्र प्रदेश आयटी संयोजक सतीश निकम यांनीदेखील उपस्थिती नोंदवली.

या कार्यक्रमात ग्राहकप्रकोष्ठ प्रमुख संतोष कडू यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सहकार भारती नवीन अध्यक्ष प्रमोद जोशी आणि कार्यक्रमाचे माहिती दिली. आमदार मंदा यांनी संस्थेचे पूनर्निर्माण करताना विकासकाची निवड काटेकोरपणे आणि त्याचा पूर्व इतिहास पाहून करावे अशा प्रकारचे मार्गदर्शन केले. सतीश निकम यांनी सहकार भारतीची स्थापना उद्देश याची माहिती उपस्थितांना दिले. लक्ष्मण पाथरा यांनी सहकार भारतीचे सद्य परिस्थितीला आवश्यकता का आहे? यावर भाष्य केले. त्याचप्रमाणे पूनर्निर्माण ॲड. सिंगारे, ॲड. चंद्रकांत निकम, लेखापरीक्षक पाकळे उदय वारुंजीकर यांनी मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम सहकार भारती यांनी संस्था यामधील दुवा साधण्यासाठी होता, असे अध्यक्ष प्रमोद जोशी यांनी सांगितले.



# नवी मुंबईतील तलावांत मत्स्यपालन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महापालिका क्षेत्रामधील १२ तलावांत मत्स्यपालनाला परवानगी देण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. यासाठी निविदा मागविण्यात आल्या असून तलावांची स्वच्छता, देखभाल करण्याची जबाबदारीही ठेकेदारांवर सोपविण्यात येणार आहे.

नवी मुंबईत प्रत्येक नोडमध्ये तलाव आहेत. महापालिकेने तलाव व्हीजनअंतर्गत सुशोभिकरण केले आहे. तलावांची नियमित देखभाल करता यावी, तलावामधील प्रदूषण थांबविण्यासाठी तेथे मत्स्यपालन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वीही ठेकेदारांची नियुक्ती केली होती मात्र कामाची मुदत संपल्याने पुन्हा निविदा मागविण्यात आली आहे. मत्स्यपालनसाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या ठेकेदारांवर तलावामधील गाळ काढणे, स्वच्छता ठेवणे, पाण्याचा योग्य तपासण्या करण्याची जबाबदारी असेल. महापालिकेने तलावनिहाय निविदा मागविल्या आहेत. त्यामुळे तलावांची देखभाल योग्य पद्धतीने होणार असल्याचे महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी स्पष्ट केले.

# आकाश-बायजुस संयुक्तिक वर्गाची खारघरमध्ये सुरुवात

**पनवेल : वार्ताहर**

हजारो विद्यार्थ्यांना डॉक्टर आणि आयआयटीयन बनण्याचे त्यांचे स्वप्न साकार करण्यात मदत करण्यासाठी आकाश व बायजुस यांचे संयुक्तिक केंद्र खारघर शहरात सुरू केले आहे.



खारघर येथील नवीन केंद्रामध्ये ३२०विद्यार्थ्यांसाठी चार प्रशस्त वर्ग असणार आहेत. या क्लासरूम सेंटरचे उद्घाटन आकाश बायजूसचे प्रादेशिक संचालक अमितसिंग राठोड आणि कंपनीच्या इतर अधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले. व्यवस्थापकीय संचालक आकाश चौधरी म्हणाले, खारघरमधील हे नवीन केंद्र विद्यार्थांना ऑलिम्पियाड्सचा टप्पा पार करण्यासाठी तसेच डॉक्टर आणि आयआयटीयन बनण्याची तयारी करणाऱ्या स्थानिक विद्यार्थ्यांसाठी एक मोठे वरदान ठरेल. आकाश-बायजुस येथे दिले जाणारे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांसाठी व्यापक बनवितात. आकाश -बायजूस येथील तज्ज्ञ प्राध्यापक आधुनिक आणि परस्परसंवादी शिक्षण पद्धतींचा अवलंब करतात ज्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांचे ध्येय साध्य करण्यात मदत होते.

# लिमये वाचनालयातर्फे वसंतोत्सव व्याख्यानमाला

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालयाच्या वतीने शुक्रवारी (दि. २२) संस्थेच्या सभागृहात माहितीचा अधिकार कायदा २००५ या विषयावर मंत्रालयाचे निवृत्त सहसचिव सुरेश सोनवणे यांचे व्याख्यान झाले.

प्रथम संस्थेच्या अध्यक्ष सुनिता जोश यांनी प्रमुख वक्त्यांचे स्वागत करून संस्थेच्या कार्यविषयी माहिती दिली. संस्थेचे कार्यवाह काशिनाथ जाधव यांनी प्रमुख वक्त्यांचा परिचय करून दिला. प्रमुख वक्ते सुरेश सोनवणे यांनी, माहितीचा अधिकार कायदा २००५ हा काश्मिर राज्य वगळून सर्व भारतात लागू झाला आहे. प्रत्येक नागरिकाला काही नियमांच्या अधीन राहून शासनाचे विविध निर्णय, एखाद्या प्रकल्पाची अथवा योजनेची माहिती या अधिकारांमुळे मिळविण्याचा हक्क आहे. संबंधित खात्याच्या माहिती अधिकाऱ्याने ही माहिती पुरवणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमासाठी संस्थेचे कार्याध्यक्ष विनायक वत्सराज, उपाध्यक्ष श्याम वालावलकर, सहचिटणीस जयश्री शेट्ये, सदस्या हेमा गद्रे, हिमालिनी कुलकर्णी, सदस्य प्रशांत राजे, ग्रंथपाल निकिता शिंदे यांच्यासह वाचक वर्ग उपस्थित होता.

# सर्वोदय वृद्धाश्रमात अन्नधान्याचे वाटप

**उरण : बातमीदार**

येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेतर्फे पनवेल तालुक्यातील सर्वोदय वृद्धाश्रम येथे सामाजिक बांधिलकी जपत १०० किलो तांदूळ, २० किलो गहू, १० किलो साखर, १० किलो कांदे अन्नधान्याचे वाटप करण्यात आले.



श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेचे वर्षभर विविध उपक्रम सुरू असतात. वृद्धाश्रमातील वृद्धांच्या समस्या जाणून घेत त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होत ज्येष्ठ नागरिकांना अन्नधान्य देऊन त्यांचा आनंद द्विगुणित केला. यासाठी संस्थेचे अध्यक्ष सुदेश पाटील यांनी विशेष पुढाकार घेतला. या वेळी संस्थेचे अध्यक्ष सुदेश पाटील, कार्याध्यक्ष विठ्ठल ममताबादे, सल्लागार ॲड. गुरुनाथ भगत, सदस्य प्रणय पाटील, साहिल म्हात्रे, प्रकाश म्हात्रे, प्रणित पाटील आदी उपस्थित होते. सर्वोदय संस्थेचे प्रमुख अल्लाउद्दीन शेख यांनी श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेच्या उपक्रमाचे कौतुक केले. पनवेल तालुक्यात शांतीवन, स्नेहकुंज, सर्वोदय आदी वृद्धाश्रम असून महात्मा गांधी, विनोबा भावे यांच्या विचार, तत्व प्रणालीवर चालणाऱ्या संस्था आहेत असे सांगत अल्लाउद्दीन शेख यांनी वृद्धाश्रमाच्या कामकाजाविषयी विविध माहिती संस्थेच्या पदाधिकारी, सदस्यांना दिली. उपस्थित सर्वांचे आभार अल्लाउद्दीन शेख यांनी मानले.

# ओवळे येथे छकड्यांच्या शर्यतींचा थरार



**पनवेल : वार्ताहर**

तालुक्यातील ओवळे ग्रामस्थ मंडळातर्फे गावदेवी ओवाळू माता यात्रेनिमित्त छकड्यांच्या जंगी शर्यतीचे आयोजन नंदराज मुंगाजी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते.

या शर्यतींना महाराष्ट्र बैलगाडा संघटना अध्यक्ष पंढरीशेठ फडके यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

बैलगाडा शर्यत हा केवळ मनोरंजनाचा विषय राहिलेला नाही तर राज्याची परंपरा आहे. गेल्या अनेक वर्षांपासून गावातील यात्रा, विविध सणानिमित्त बैलगाडा शर्यती भरविण्याची परंपरा आजही जपली जाते. या शर्यतीबद्दल सर्वसामान्यांना किती प्रेम आहे याचे दर्शन रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील ओवळे येथील बैलगाडा शर्यतीदरम्यान दिसून आले आहे.

ओवळे येथे ओवाळू माता यात्रेनिमित्त विनाकाठी लाठी भव्य बैलगाडा शर्यती पार पडल्या. गेल्या अनेक महिन्यांपासून बैलगाड्या शर्यती पार पडलेल्या नसल्याने यंदाच्या बैलगाडी शर्यतीचे आकर्षण होते.

शासकीय नियमांचे पालन करून बैलगाडा शर्यत सुरू करण्यात आल्या. या वेळी अनेकांनी या शर्यती पाहण्यासाठी गर्दी केली होती. या वेळी शर्यती पाहण्यासाठी आलेल्या शर्यतप्रेमींना पंढरीशेठ फडके व नंदराज मुंगाजी यांनी मार्गदर्शन केले. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.



# चिखले येथील सैनिकी शाळेत प्रवेश प्रक्रिया सुरू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील चिखले येथील विजय आर्मी स्कूल अँड. ज्यु. कॉलेजमध्ये मुलांसाठी इयत्ता सहावी, इयत्ता सातवी सेमी इंग्रजी व इयत्ता अकरावी विज्ञान शाखेसह इतर वर्गांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे.

विजय आर्मी स्कूल अँड ज्यु. कॉलेज ही रायगड जिल्ह्यातील एकमेव अनुदानित मुलांसाठी सैनिकी शाळा आहे. प्रवेश घेताना एससी, एनटी, एसबीसी या संवर्गातील विद्यार्थ्यांना शासकीय आरक्षणानुसार जागा आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत, तसेच आदिवासी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र तुकडी व निःशुल्क असणार आहे. शालेय शिक्षणाबरोबरच सैनिकी प्रशिक्षण, स्पर्धा परीक्षांची तयारी, हत्यार प्रशिक्षण, सुसज्ज विद्यार्थी वसतिगृह, कमांडरची नियुक्ती, युद्ध कौशल्य, पोहणे, घोडेस्वारी, विविध खेळ, वैद्यकीय सुविधा, सहली, सुसज्ज कॉम्प्युटर लॅब, विविध शिबिरे, सुसज्ज प्रयोगशाळा अशा सुविधा सैनिकी शाळेत उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. प्रवेशासंबंधी अधिक माहितीसाठी कमांडंट (८१६९५०८१७), प्राचार्य (९८६७३०१७२५), पर्यवेक्षक (९५६१४०६८८२), लिपिक (९४२१६३६१३२), उपप्राचार्य (८८०३०६८०३६८) या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# करुणेश्वर आधारगृहात हळदीकुंकू समारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

येथील भारत विकास परिषदेच्या वतीने भानघर येथील करूणेश्वर आधारगृह येथे चैत्रगौरीच्या हळदीकुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले. भारूड, नृत्य, गाणी, गप्पा, गोष्टी तसेच चैत्रगौरीचा प्रसाद, डाळ, पन्हे अशाप्रकारे हा कार्यक्रम आनंदात पार पडला.

आधारगृहाच्या आधारस्तंभ करूणा ढेरे यांची ओटी भरण्यात आली. रुपकात्मक गोष्टी, प्रसंग, संवाद, विनोदी शैलीतून उभे करून संतांनी सांगितलेली जीवनाची सूत्रे भारूडाच्या माध्यमातून सुनिता खरे, अक्षया चितळे आणि स्वाती कोळी यांनी मांडली. या वेळी महिलांनी बिहू नृत्याचे सादरीकरण केले. माधव भागवत यांनी तबलासाथ केली. वैशाली केतकर यांच्या निवेदनामुळे कार्यक्रम रंगतदार ठरला.

**भाविप संस्थेचे कार्य संस्कार, संपर्क, सहयोग, सेवा व समर्पण या पंचसुत्रांच्या आधारे होते. पनवेल शाखाही सर्व सेवाकार्यांमध्ये मोठ्या उत्साहाने पुढाकार घेते. वृद्धाश्रमातील वृद्धांना आनंदाचे काही क्षण देण्याचा प्रयत्न परिषदेच्या महिला सदस्यांनी केला.**

**-पद्मजा कुलकर्णी, भाविप महिला अध्यक्ष, पनवेल**



# आमदार चषक राज्यस्तरीय
# कबड्डी स्पर्धा बक्षीस वितरण

आयपीएलचा रनसंग्राम आजचा सामना बंगळुरू वि. राजस्थान सायं. ७.३० वा., पुणे





















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com